


सांध्य दैनिक

# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com

Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026




❑ वर्ष - २ रे ❑ अंक -२३१ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ शुक्रवार दि. ११ ऑक्टोंबर २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६


## ईव्हीएम वर आता आरोप करु नका; हरयाणा निकालानंतर काँग्रेसने बदलली रणनीती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नवी दिल्ली**

हरयाणात नुकत्याच पार पडलेल्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस पक्षाने अपेक्षेप्रमाणे कामगिरी केली आहे. हरयाणाच्या निवडणुकीच्या निकालात मतमोजणीत गैरप्रकार झाल्याची तक्रार काँग्रेसने केली होती. याप्रकरणी काँग्रेस नेत्यांच्या शिष्टमंडळाने दिल्लीत निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांची भेट घेतली. मतदानासाठी वापरलेले ईव्हीएम हॅक झाल्याचे काँग्रेस नेत्यांनी सांगितले. त्यामुळे २० जागांच्या निकालात फेरफार झाल्याचा दावा काँग्रेसने केला होता. मात्र आता हरयाणामधील पराभवानंतर काँग्रेसने अचानक आपली रणनीती बदलली आहे. ईव्हीएमच्या मुद्द्यावरुन कोणतीही टीका करणार नसल्याचे काँग्रेसने ठरवलं आहे.

हरयाणा विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर काँग्रेस नेते ईव्हीएमवरुन निवडणूक आयोगावर आरोप करत होते. मात्र आता काँग्रेस पक्षाने रणनीती बदलण्याचा निर्णय घेतला आहे. ईव्हीएमला लक्ष्य करण्याऐवजी पक्षाला आता अंतर्गत समस्यांवर लक्ष केंद्रित करायचे आहे. हरयाणात विजयाच्या जवळ जावून देखील तो मिळवता न आल्याने काँग्रेस आता पक्षातील उणिवा



शोधण्याचा प्रयत्न करणार आहे. काँग्रेसने यापूर्वी ईव्हीएमवर आरोप केले होते आणि निवडणुकीचे निकाल चुकीचे असल्याचे म्हटले होते. आता काँग्रेसच्या रणनीतीकारांनी ठरवले आहे की ते पुरेशा पुराव्याशिवाय ईव्हीएमवर हल्ला करणार नाहीत.

हरयाणातील पराभवावर काँग्रेस पक्षाने गुरुवारी आढावा बैठक बोलावली होती. पक्षांतर्गत गटबाजी आणि इतर चुका दूर करण्यावर आता पक्ष भर देणार असल्याचे या बैठकीत ठरवण्यात आलं. तसेच ईव्हीएम छेडछाडीचे ठोस पुरावे मिळेपर्यंत आपण हा मुद्दा उपस्थित करणार नाहीत आणि पक्षातील अंतर्गत उणिवा ओळखून त्या दूर करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे पक्षाच्या हायकमांडने म्हटल. गुरुवारी संध्याकाळी मल्लिकार्जुन खरगे यांच्या कार्यालयातून यासंदर्भात एक पत्र जारी करण्यात आले आहे. पक्षाने एक तांत्रिक टीम तयार केली आहे जी ईव्हीएम आणि मतदानाबाबत उमेदवारांनी केलेल्या तक्रारींची तपासणी करेल आणि खऱ्या उणिवा शोधून काढेल, असे या पत्रात म्हटलं आहे.

फॅक्ट फाइंडिंग टीमच्या अहवालानुसारच काँग्रेस ईव्हीएम बाबत कोणतीही प्रतिक्रिया देईल, असे या पत्रात म्हटले आहे. मतमोजणी प्रक्रिया आणि इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रांच्या कार्यपद्धतीवर तथ्य-शोधन पथकाच्या अहवालाच्या आधारे काँग्रेस सविस्तर प्रतिक्रिया देईल, असे खरगे यांनी म्हटलं आहे.

महत्त्वाची बाब म्हणजे हरयाणाचे माजी मुख्यमंत्री बीएस हुड्डा आणि त्यांच्या विश्वासू लोकांव्यतिरिक्त, माजी केंद्रीय मंत्री कुमारी शैलजा आणि त्यांचे सहकारी रणदीप सिंग सुरजेवाला यांना या बैठकीला आमंत्रित करण्यात आले नव्हते. निवडणुकीदरम्यान माजी मुख्यमंत्री भूपेंद्र सिंह हुड्डा आणि कुमारी सेलजा यांच्यात तणाव निर्माण झाला होता.

## राणा पती-पत्नीत जागा वाटपावरून मतभेद?

### रवी राणांच्या जागांवर नवनीत यांचा डोळा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ११ अमरावती**

माजी खासदार नवनीत राणा आणि आमदार रवी राण हे राजकारणातलं बहुचर्चीत दाम्पत्य आहे. नवनीत राणा यांच्या लोकसभा निवडणुकीसाठी रवी राणा यांनी जोरदार प्रचार केला होता. त्या निवडून याव्या यासाठी त्यांनी जोरदार प्रयत्न ही केले होते. पण त्यांचे प्रयत्न तोकडे पडले. नवनीत राणा यांना पराभव स्विकारावा लागला. लोकसभेला नवनीत राण यांनी युवा स्वाभिमान पक्षाला सोडचिठ्ठी देत भाजपचे कमळ हाती घेतले. त्यामुळे सध्या तरी हे पती पत्नी वेगवेगळ्या पक्षात काम करत आहेत. आता विधानसभा निवडणूक तोंडावर आहे. त्यात रवी राणा यांच्या



युवा स्वाभिमान पक्षाने महायुतीत काही जागांवर दावा केला आहे. विशेष म्हणजे त्या जागा भाजपलाच मिळाल्या पाहीजे असा हट्ट नवनीत राणा यांनी धरला आहे. त्यामुळे या पती पत्नीत सध्या जागा वाटपावरून मतभेद असल्याचे दिसून येत आहे.

## टाटा ट्रस्टच्या अध्यक्षपदी नोएल टाटा यांची नियुक्ती, संचालक मंडळाच्या बैठकीत निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११मुंबई**

रतन टाटा यांच्या निधनानंतर टाटा ट्रस्टची धुरा कोण सांभाळणार? हा मोठा प्रश्न होता. दरम्यान, आता टाटा ट्रस्टच्या अध्यक्षपदी नोएल टाटा यांची निवड करण्यात आल्याची माहिती समोर आली आहे.



नोएल टाटा सध्या सर दोराबजी टाटा ट्रस्ट आणि सर रतन टाटा ट्रस्टचे विश्वस्त आहेत. टाटा सन्समध्ये या दोन्ही ट्रस्टचा मिळून ६६ टक्के हिस्सा आहे. टाटा सन्स ही टाटा समूहाची मूळ कंपनी आहे. दरम्यान, आज टाटा ट्रस्टच्या संचालक मंडळाची बैठक पार पडली. यामध्ये नोएल टाटा यांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आलं.

**प्रकाशझोतापासून दूर**

एकीकडे रतन टाटा हे हा टाटा समूहाचा प्रमुख चेहरा होते. तर दुसरीकडे नोएल टाटा हे पडद्यामागे काम करणारे आहेत. ते माध्यमांपासूनही दूर राहतात. समूहाच्या जागतिक उपक्रम आणि रिटेल क्षेत्रावर त्यांचे लक्ष होते.

**अनेक कंपन्यांची जबाबदारी**

नोएल टाटा गेल्या ४० वर्षांपासून टाटा समूहाचा भाग आहेत. सध्या ते टाटा समूहातील अनेक कंपन्यांचे संचालक मंडळाचे सदस्य आहेत. ते टाटा इंटरनॅशनल लिमिटेड, व्होल्टास आणि टाटा इन्व्हेस्टमेंट कॉर्पोरेशनचे अध्यक्ष आहेत. टाटा स्टील अँड टायटन कंपनी लिमिटेडमध्ये ते उपाध्यक्ष म्हणूनही कार्यरत आहेत. नोएल टाटा ऑगस्ट २०१० ते नोव्हेंबर २०२१ दरम्यान ट्रेंटचे व्यवस्थापकीय संचालक होते. त्यांच्या नेतृत्वाखाली ट्रेंटची उलाढाल ५०० मिलियन डॉलर्सवरून वाढून ३ बिलियन डॉलरवर गेली. नोएल टाटा यांनी ससेक्स विद्यापीठातून पदवी घेतली आहे. दरम्यान, असं मानलं जातं होतं की टाटा ट्रस्टची कमान अशा व्यक्तीला दिली जाऊ शकते ज्याचं नाव टाटाशी संबंधित आहे. यानंतर आज बैठकीत नोएल टाटांच्या नावावर शिक्कामोर्तब करण्यात आलं.


## राज्य सरकार राबवणार 'घर घर संविधान' उपक्रम; उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांची घोषणा

### या उपक्रमात मोठ्या उत्साहात सहभागी होऊन आणि संविधानाचा जागर करण्याचे केले आवाहन

**विदर्भ प्रजासत्ताक दि.११नागपूर**

२६ नोव्हेंबर १९५० पासून संविधानाची अंमलबजावणी सुरू झाली. भारतीय संविधानात समाजवादी, धर्मनिरपेक्ष, लोकशाही, गणराज्य घडवण्याचा आणि नागरिकांना सामाजिक, आर्थिक, राजनैतिक न्याय, विचार, अभिव्यक्ती स्वातंत्र्य, एकात्मता, बंधुता आणि मूल्यांचा विचार केलेला आहे. भारतीय संविधान हे एक जिवंत दस्तऐवज आहे जे देशाच्या विकासात आणि लोकांच्या जीवनात गुणवत्तेत महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. भारतीय संविधानास ७५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त २०२४-२५ या अमृत महोत्सवी वर्षात 'घर घर संविधान' उपक्रम राज्य सरकारने हाती घेतला असल्याची घोषणा उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केली आहे. त्याबाबतचा शासकीय निर्णयही जारी केला आहे.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी जगातील जे सर्वोत्कृष्ट संविधान



भारताला दिले, त्याला ७५ वर्ष पूर्ण होत आहेत. त्यानिमित्त संविधानाचा अमृत महोत्सव महाराष्ट्र सरकारतर्फे राज्यात २०२४-२५ या काळात साजरा केला जाणार आहे. याचा शासन आदेश सुद्धा जारी करण्यात आला आहे. यानिमित्ताने 'घर घर संविधान' या अभियानाची आखणी करण्यात आली असून अनेकविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. संविधानाबाबत जागरूकता, शिक्षण, त्यातून मूल्य संस्कार आणि राष्ट्रीय एकात्मतेसाठी सर्वांचा सक्रिय सहभाग यातून साध्य केला जाणार आहे. या 'घर घर संविधान' उपक्रमात सर्वांनी मोठ्या उत्साहात सहभागी व्हावे आणि संविधानाचा जागर करावा असं आवाहन त्यांनी जनतेला केले आहे.

**कसा असणार 'घर घर संविधान' उपक्रम?**

या उपक्रमाचा एक भाग म्हणून राज्याने शाळा, महाविद्यालये आणि वसतिगृहांमध्ये संविधानाची उद्दिष्टे ठळक ठिकाणी लावण्याचे आदेश दिलेत. जेणेकरून विद्यार्थी सहजपणे त्याचे वाचन करू शकतील. वसतिगृहांमध्ये संविधानाच्या उद्दिष्टांचे दैनंदिन वाचन देखील करण्यात यावे, असे निर्देश दिले आहेत. विद्यार्थ्यांना संविधानाची सखोल समज मिळवून देण्यासाठी शाळांमध्ये ६०-९० मिनिटांची व्याख्याने आयोजित केली जातील, ज्यामध्ये संविधानाच्या निर्मितीची प्रक्रिया, त्यातील विविध विभाग, अधिकार आणि कर्तव्ये याबद्दल माहिती दिली जाईल. शिक्षक विद्यार्थ्यांना संविधानातील तत्त्वज्ञान समजून घेण्यासाठी मार्गदर्शन करतील. याशिवाय, संविधानाच्या महत्त्वावर विशेष कार्यशाळा व चर्चासत्रे आयोजित करण्यात येतील.

शाळा व महाविद्यालयांनी संविधानाच्या विविध विभागांची माहिती देणारी फलक व पोस्टर्स लावण्याची सूचनाही दिली आहे. रस्त्यावर नाटकांद्वारे संविधानाबद्दल जागरूकता पसरवण्याची शिफारस देखील करण्यात आली आहे. निबंध लेखन, वादविवाद आणि वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन देखील करण्यात यावे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या बैठका संविधानाच्या उद्देश वाचनाने सुरू करण्याचेही निर्देश दिले आहेत आणि राज्य विधिमंडळाच्या सत्रांना देखील याच पद्धतीने सुरुवात केली जाईल.

'घर घर संविधान' योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी महाराष्ट्राचे मुख्य सचिव यांच्या अध्यक्षतेखाली १२ सदस्यीय समिती स्थापन करण्याची शिफारस जीआरमध्ये करण्यात आली आहे. जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली ७ सदस्यीय समिती स्थापन केली जाईल.

## ऐन निवडणुकीच्या तोंडावर राज्यातील सरकारी बांधकामे ठप्प

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११नागपूर**

सध्या महाराष्ट्रात निवडणुकीची तयारी सुरू झाली आहे. सत्ताधारी महायुती सरकारने रोज लोकप्रिय घोषणांची मालिका सुरू केली आहे. विकासकामांच्या घोषणा केल्या जात आहेत. दुसरीकडे लाडकी बहीण योजनेमुळे सरकारी तिजोरीत खडखडाट आहे. अशा परिस्थितीत सरकारकडे देणी चुकती करण्यासाठी निधी उपलब्ध नाही.

राज्य शासनाकडे ४० हजार कोटींहून अधिकची देयके थकल्याने सार्वजनिक बांधकाम विभागाच्या राज्यभरातील सुमारे तीन लाखांहून अधिक कंत्राटदारांनी घेतलेली शासनाची सर्व कामे थांबवली आहेत. यामुळे त्यांच्या बंद कामाचा फटका सर्वसामान्य जनतेला बसण्याची शक्यता आहे. राज्यातील सार्वजनिक बांधकाम विभागाची कामे करणाऱ्या कंत्राटदारांची फेब्रुवारीपासून सरासरी ४० हजार कोटींची देयके थकली आहेत. अनेकांनी कर्ज घेऊन कामे सुरू केल्याने त्यांच्यावर कर्ज परतफेडीचे संकट ओढवले आहे. त्यांच्याकडे काम करणाऱ्या कामगारांचे वेतनही थकले आहे. या प्रश्नाकडे लक्ष वेधण्यासाठी महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटना आणि इतर संघटनांनी शासनाला निवेदन देऊन थकीत रक्कम चुकती करण्याची विनंती केली होती. मात्र त्याकडे दुर्लक्ष करण्यात आले. त्यामुळे कंत्राटदारांनी शासनाची कामे थांबवण्याचा निर्णय घेतला आहे.

गुरुवार ११ ऑक्टोबरला दुपारी ४ वाजता राज्यातील ३५ जिल्ह्यांतील संघटनेच्या पदाधिकाऱ्यांची ऑनलाईन बैठक पार पडली. त्यात राज्यातील ३ लाख कंत्राटदार त्यांच्या मागण्यांचे निवेदन राज्यपाल, मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री व कंत्राटदारांवर अवलंबून असलेल्या घटकांना दररोज तीन वेळा मेल करणार आहे, असे महाराष्ट्र राज्य कंत्राटदार महासंघ व राज्य अभियंता संघटनेचे राज्य अध्यक्ष मिलिंद भोसले, सरचिटणीस सुनील नागराळे यांनी कळवले आहे.

## सरकारी निर्णयांचा पाऊस! आचारसंहितेपूर्वी फक्त १० दिवसांत तब्बल १२९१ शासन निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ मुंबई**

राज्यात विधानसभा निवडणुकीची घोषणा लवकरच होण्याची शक्यता आहे. त्यामुळे राज्यातील महायुती सरकार ॲक्शन मोडमध्ये आले आहे. शासन निर्णयांचा धडाकाच लावण्यात आला आहे. शासन निर्णयांचा पाऊस पडू लागला आहे. फक्त दहाच दिवसांत तब्बल १ हजार २९१ निर्णय घेण्यात आले आहेत. विविध योजना आणि विकासकामांची घोषणा करण्यात आली आहे. सत्ताधाऱ्यांचा हा मूव्ह विरोधी पक्षांना मात्र अस्वस्थ करू लागला आहे. सरकारी तिजोरीत खडखडाट असताना फक्त टक्केवारीचं हित साधण्यासाठी सरकारकडून निर्णय घेतले जात असल्याचा आरोप विरोधी नेत्यांनी केला आहे. त्यांच्याकडून आरोप होत असले तरी सत्ताधाऱ्यांनी निर्णय घेण्यात मात्र हात आखडता घेतलेला नाही.



राज्यात अद्याप निवडणुकीची घोषणा झालेली नाही. निवडणूक आयोगाच्या अधिकाऱ्यांनी काही दिवसांपूर्वी राज्याचा दौरा केला होता. या दौऱ्यात राज्यातील निवडणूक तयारीचा आढावा घेण्यात आला होता. यानंतर या दौऱ्याची माहिती मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी प्रसारमाध्यमांना दिली होती. या घडामोडींनंतर राज्यात लवकरच निवडणुकांची घोषणा होईल असे सांगण्यात येत आहे.

निवडणुका केव्हाही जाहीर होण्याची शक्यता पाहता राज्य सरकारने निर्णयांचा धडाका लावला आहे. मागील दहा दिवसांत तब्बल १२९१ निर्णय घेण्यात आले. तसेच मागील महिन्यात सरकारने जवळपास १३२ निर्णय घेण्यात आले होते. विधानसभा निवडणुकीआधी प्रलंबित राहिलेले सर्व निर्णय राज्य सरकारने घेऊन टाकले आहेत. राज्य सरकारने इतक्या मोठ्या प्रमाणात निर्णय घेतल्याने या निर्णयांची अंमलबजावणीसाठी निधीची अडचण अर्थ विभागासमोर उभा राहण्याची शक्यता व्यक्त होत आहे. अर्थ खात्याचा विरोध असतानाही मंत्री अगदी शेवटच्या वेळी निर्णय जाहीर करत असल्याने अर्थमंत्री अजित पवार यांची नाराजी वाढत चालल्याचेही बोलले जात आहे.दरम्यान, आचारसंहिता जाहीर होण्याआधी १ ऑक्टोबर रोजी सरकारने १४८ निर्णय जारी केले. ३ ऑक्टोबरला २०३ निर्णय, ४ ऑक्टोबरला १८८ निर्णय, ५ ऑक्टोबरला २ निर्णय, ७ ऑक्टोबरला २०९ निर्णय, ८ ऑक्टोबरला १५० निर्णय, ९ ऑक्टोबर रोजी १९७ निर्णय तर काल १० ऑक्टोबर रोज तब्बल १९४ शासन निर्णय जारी करण्यात आले. तसेच मागील सप्टेंबर महिन्याचा विचार केला तर २३ सप्टेंबर या दिवशी २४ निर्णय घेण्यात आले होते. ३० सप्टेंबर रोजी ३८ निर्णय, ४ सप्टेंबरला ३२ तर १० सप्टेंबर रोजी ३८ निर्णय राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत घेण्यात आले होते.

## संपादकीय ......

# उद्योगरत्न रतन टाटा

*महाराष्ट्र सरकारचा पहिला-वहिला उद्योगरत्न पुरस्कार टाटा उद्योग समूहाचे अध्वर्यू राहिलेले रतन टाटा यांना प्रदान करण्यात आला. टाटांचे वय लक्षात घेऊन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, दोन्ही उपमुख्यमंत्री यांनी घरी जाऊन टाटांना हा पुरस्कार दिला. त्यांची या पुरस्कारासाठी झालेली निवड योग्य नाही, असे कुणीही म्हणणार नाही. रतन टाटा या नावामागेच भारतीय उद्योगजगताचे सारे सर्वस्व सामावलेले आहे. रतन टाटा यांनी १९९१ साली तत्कालीन टाटा उद्योग समूहाचे प्रमुख जेआरडी टाटा यांच्याकडून उद्योगाचे प्रमुखपद स्वीकारले. ते जेव्हा या पदावर होते तेव्हा टाटा उद्योग समूहाचे उत्पन्न पन्नास पटींनी वाढवूनच टाटांनी दुसऱ्याच्या हाती पद सोपवले.*

*टाटा उद्योग समूह म्हणजे निव्वळ उद्योग समूह नाही तर त्यामागे संस्कृती, कामगार वर्गाची प्रतिष्ठा आणि कामगारांचा मालकावर असलेला विश्वास ही सारी परंपरा येते, याचे भान रतन टाटांना नेहमीच राहिले. त्यामुळे त्यांच्या काळात आणि पूर्वीही टाटांनी औद्योगिक नितीमत्ता जपली आणि तिचाच कायम पाठपुरावा केला. रतन टाटा याच्या उद्योगाप्रती असलेल्या निष्ठेचे एकच उदाहरण पुरेसे आहे. टाटा यांच्या ताजमहाल पॅलेस हॉटेलवर जेव्हा अतिरेकी हल्ला झाला तेव्हा टाटा स्वतः हॉटेलमध्ये यायला निघाले होते. कारण तेथे एकही टेलिफोन ऑपरेटर जागेवर हजर नव्हता. जेआरडी टाटा यांनी अत्यंत मेहनतीने विमान कंपनी सुरू केली आणि तिचे नाव होते एअर इंडिया. ही कंपनी आजही लोकप्रियतेच्या बाबतीत शिखरावर आहे. जरी ती आज कर्जबाजारी झाली असली तरीही तिच्या महाराजाला कुणीही विसरणार नाही. साम्यवादाच्या बिनडोक तत्त्वज्ञानाकडे आकर्षिले गेलेले पंडित नेहरूंनी त्यांच्या मंत्रिमंडळात असलेले एक मंत्री रफी अहमद किडवाई यांच्या बिनडोक आग्रहामुळे ही कंपनी सरकारच्या घशात घातली. उद्योग सरकारला चालवायची अक्कल नाही, ही अक्कल तेव्हा राज्यकर्त्यांना आली नव्हती. रतन टाटा यांच्या काळात पुन्हा टाटा समूहाकडे ही कंपनी आली. पण जेव्हा जेआरडी यांनी टाटा समूहाचे प्रमुख म्हणून रतन टाटा यांच्या नावाची घोषणा केली तेव्हा कंपनी कर्जबाजारी झाली होती. दररोज पन्नास हजार कोटी रुपयांचे कर्ज कंपनीवर झाले होते.*

*सरकारचा फाजिलपणा इतका की, जेआरडी यांची कंपनी घशात घालून त्यांनाच पुन्हा कंपनीचे प्रमुख म्हणून काम पाहण्यास सांगण्यात आले होते. रतन टाटा यांचे टाटा सन्सचे प्रमुख म्हणून नाव जाहीर होताच उद्योग वर्तुळातून बरीचशी नाराजीच व्यक्त करण्यात आली. रतन टाटा यांची समूहाचे प्रमुख म्हणून झालेली निवड योग्य नाही, असा सूर उमटत होता. पण रतन टाटा यांनी नंतर अशी काही भरारी मारली की सारा समूह आश्चर्यचकित होऊन पाहातच राहिला. टाटा सन्सचा प्रमुख हाच टाटा उद्योग समूहाचा प्रमुख असतो. रतन टाटा १९६१ मध्ये उद्योग समूहात जॉईन झाले आणि १९९१ मध्ये जेआरडींनी त्यांच्याकडे उद्योगाची सूत्रे बहाल करून कंपनी सोडली. त्यानंतर टाटा समूह आणि रतन टाटा यांनी कधीही मागे वळून पाहिले नाही. रतन टाटा हे एक उदार म्हणून ओळखले जातात. त्यांनी जितकी आर्थिक मदत केली आहे, तितकी ती कुणीही केलेली नाही. मुकेश अंबानी यांनीही नाही.*

*रतन टाटा यांच्याकडे उद्योगाची सूत्रे आली तेव्हा टाटा समूह नेहमीप्रमाणे आघाडीवर होता. आज नव्वदीच्या घरात असलेले टाटा अजूनही फिरतात आणि तितक्याच आस्थेने उद्योगाची देखरेख करतात. रतन टाटा यांच्यावर जेआरडींनी जो विश्वास टाकून त्यांच्याकडे उद्योगाची सूत्रे दिली, त्याला रतन यांनी कधीही तडा जाऊ दिला नाही. रतन टाटा हे नवल टाटा यांचे सुपुत्र आहेत. टाटा समूहाचे अध्यक्षपद त्यांनी १९९० ते २०१२ इतका प्रदीर्घकाळ सांभाळले. महाराष्ट्रातील उद्योग बाहेर जाण्याची विषारी चर्चा विरोधी पक्ष आज करत असताना रतन टाटा यांना पहिला उद्योगरत्न पुरस्कार दिला जावा, यास वेगळे महत्त्व आहे. रतन टाटा यांचा भर इतर उद्योगांचे ग्रहण करण्याकडे राहिला आहे. टाटा टीच्या अंतर्गत त्यांनी विविध उद्योग अधिग्रहित केले आणि आपले ६० ते ६५ टक्के उत्पन्न धर्मादाय मदतीसाठी दान केले आहे. शिवाय त्यांनी या दानाची कसलीही जाहिरात केली नाही.विविध समूहांमध्ये रतन टाटा यांनी भरपूर गुंतवणूक केली आहे आणि त्यांच्या या गुंतवणुकीच्या जोरावरच तर टाटा उद्योग समूह सुस्थितीत आहे.*

*रतन टाटा यांनीच सामान्य मध्यमवर्गीयांच्या जीवनात त्यांचे कारचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी टाटा नॅनो कार हे वाहन आणले होते. दुर्दैवाने त्याला तितकासा प्रतिसाद मिळाला नाही. ते स्वस्त होते पण येथील रस्त्याची अवस्था पाहता ते चालू शकले नाही. पण टाटा नॅनोकारने कित्येक लाख मध्यमवर्गीयांचे स्वतःची कार असल्याचे स्वप्न काही काळ तरी पूर्ण केले. ही कार मजबूत नव्हती, हा तिचा सर्वात मोठा दोष होता. कोणतेही मोठे वाहन बाजूने गेले तरीही ही कार मुळापासून हादरायची. आता ती दिसतच नाही. ३० हून अधिक स्टार्ट अप्समध्ये रतन टाटा यांनी गुंतवणूक केली आहे. रक्ताने रतन टाटा हे टाटा कुटुंबापैकी एक आहेत. १९७० मध्ये टाटा यांना कंपनीत व्यवस्थापनाचे पद देण्यात आले. त्यानंतर त्यांच्यावर टाटा स्टील्सची जबाबदारी सोपवण्यात आली. पण टाटा यांचा प्रवास काही सुखकर नव्हता. टाटांच्या प्रत्येक कंपनीच्या प्रमुखाकडून त्यांना सुरुवातीच्या काळात विरोध सहन करावा लागला होता. त्यानंतर आज त्यांना भारतरत्नच्या तोडीचा उद्योगरत्न पुरस्कार मिळाला आहे.*

# सरकारकडून कृषी खाते वाऱ्यावर!

## कृषी आयुक्तालयातील ५८ टक्के पदे रिक्त; १० हजार जागा भरल्याच नाहीत




**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११ मुंबई-** देशभरातील महाराष्ट्र हे राज्य कृषी क्षेत्रात अग्रेसर आहे. शेतमाल निर्यात, उसाचे उत्पादन, कांद्याचे उत्पादन, इतर शेतमालाच्या आणि फळांच्या उत्पादन आणि निर्यातीमध्ये महाराष्ट्र हा कायम पुढेच राहिलाय पण धक्कादायक बाब अशी की मागच्या कित्येक दिवसांपासून राज्याच्या या साम्राज्याला 'शिलेदार'च कमी आहेत. कृषी आयुक्तालयातील ५८ टक्के तर राज्यातील कृषी विभागातील ३६ टक्के जागा रिक्त आहेत.

कृषी विभागातून मिळालेल्या १ सप्टेंबरपर्यंतच्या माहितीनुसार, कृषी आयुक्तालयातील मंजूर असलेल्या ८३१ पदांपैकी केवळ ३५२ पदे भरली असून ४७९ पदे रिक्त आहेत. रिक्त पदांची ही टक्केवारी ५८ टक्के एवढी आहे. यामध्ये गट-अ मधील मंजूर ५७ जागांपैकी ३५ जागा भरलेल्या असून २२ जागा रिक्त आहेत.

गट ब च्या ११४ जागापैकी ७८ जागा भरलेल्या असून ३६ जागा रिक्त आहेत. गट क मधील ५३६ जागांपैकी २११ जागा भरलेल्या असून ३२५ जागा रिक्त आहेत. तर ड गटामधील १२४ जागांपैकी २८ जागा भरलेल्या असून ९६ जागा रिक्त आहेत.

दरम्यान, राज्यभरातील कृषी विभागाच्या सर्वच पदाचा विचार केला तर आयुक्तांपासून ड वर्गापर्यंत एकूण ३६ पदे आहेत. राज्यभरातील कृषी विभागात काम करण्यासाठी एकूण २७ हजार ५०२ पदे मंजूर आहेत. पण त्यातील केवळ १७ हजार ५०० जागा भरलेल्या असून १० हजार २ जागा रिक्त आहेत. एकूण पदांपैकी रिक्त जागांची टक्केवारी ही ३६ टक्के एवढी आहे.

रिक्त जागांमुळे अतिरिक्त परभार अधिकाऱ्यांना देण्यात येतो. या कामाचा अतिरिक्त ताण अधिकाऱ्यांवर पडल्यामुळे कामांची गती मंदावते. राज्याचे कृषी क्षेत्र देशावर प्रभाव टाकत असले तरीही कृषी विभागाची ही स्थिती आहे.

राज्य सरकारकडून निवडणुकीच्या तोंडावर प्रलंबित पीक विमा, अनुदानाची रक्कम, योजनेची उर्वरित रक्कम तातडीने मंजूर करण्यात आली. पण रिक्त पदांमुळे राज्य सरकारने शेतकरी आणि शेतकऱ्यांचे प्रश्न वाऱ्यावर सोडले आहेत का असा प्रश्न निर्माण होतोय.

# प्रक्रिया उद्योगात आवळ्याला मोठी मागणी कशी कराल आवळ्याची शेती




**दि.११विदर्भ प्रजासत्ताक**

आवळा हे एक औषधी गुणधर्म असलेले महत्वाचे फळझाड आहे. त्यात सर्वात जास्त 'क' जीवनसत्त्व (५०० ते ७०० मिली/१०० ग्रॅम गर) असून, त्याचा मोठ्या प्रमाणावर आयुर्वेदिक औषधामध्ये वापर केला जातो. त्यातील च्यवनप्राश व आवळा चूर्ण ही प्रमुख आहेत. इतर पदार्थामध्ये आवळा सिरप, आवळा सुपारीचा समावेश होतो.

**लागवडीसाठी आवश्यक जमीन** - आवळा हे उपयोगी फळझाड असून वरकस किंवा क्षारपड जमिनीतही चांगले येते. या पिकासाठी पाण्याचा होणाऱ्या साधारण आम्ल ते अल्कधर्मीय, मध्यम प्रकारच्या जमिनी चांगल्या मानवतात. हे पीक वरकस ते साधारण खारवट अशा हलक्या जमिनीत घेता येते; परंतु पाण्याचा निचरा न होणाऱ्या भारी जमिनी या पिकासाठी योग्य नाहीत.

**हवामान-** या पिकासाठी कोरडे, समशीतोष्ण कटिबंधातील हवामान चांगले मानवते; परंतु कोकणातील दमट व उष्ण हवामानातही ते चांगल्या प्रकारे येते. आवळ्याची लागवड समुद्रसपाटीनुसार १३०० मीटर उंचीपर्यंत करता येते. आवळ्याचे झाड १० अंश ते ४६ अंश सेल्सिअस इतके तापमान सहन करू शकते.

**जाती आणि लागवड-** डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषी विद्यापीठातर्फे कृष्णा, कांचन, एन. ए -७, एन. ए. -१० आणि चकय्या या आवळ्याच्या सुधारित जातींची कोकणात लागवडीसाठी शिफारस करण्यात आली आहे.

- या पिकात परागीकरण होत असल्याने अधिक फळधारणेसाठी दोन ते तीन जाती एकत्रित लावणे जरुरीचे आहे.

- आवळ्याची लागवड कलम लावून करावी कलम करण्यासाठी डोळा किंवा मृदकाष्ठ कलम पद्धती वापरतात.

- लागवडीसाठी वापरलेली आवळ्याची जात, कलम आणि जमिनीचा मगदूर विचारात घेऊन दोन ओळीतील व दोन झाडांतील अंतर सात ते दहा मीटर ठेवावे.

- कलम लागवडीनंतर पहिल्या व दुसऱ्या वर्षी खुंटावर येणारी (कलमांच्या फांद्या व्यतिरिक्त वाढणारी) फूट काढून टाकावी.

**छाटणी-** आवळ्याच्या झाडाला वळण देणे आवश्यक आहे. यासाठी प्रथम जमिनीपासून ०.७५ ते १.०० मीटर उंचीपर्यंत एक मुख्य खोड सरळ वाढवावे व नंतर त्यावर पुढे चार दिशांना चार जोमदार फांद्या वाढू द्याव्यात. अशा प्रकारे आकार देण्यासाठी अतिरिक्त आलेल्या फांद्यांची छाटणी करावी पण दरवर्षी फळे देणाऱ्या झाडांची छाटणी करणे आवश्यक नाही. उन्हाळ्यात व हिवाळ्यात पाणी दिल्यास वर्षातून दोन हंगामात फळे मिळतात.


**पिकाचा कालावधी-** कलम किंवा डोळा भरून अभिवृद्धी केलेल्या आवळ्याच्या झाडापासून सुयोग्य व्यवस्थापनामध्ये चौथ्या वर्षापासून फळे मिळण्यास सुरुवात होते आणि ५० वर्षापर्यंत मिळते. आवळ्याच्या झाडावर साल खाणारी अळी, खोड किडा, खवळे कीड व अनार बटरफ्लाय या किडी, तांबेरा, फांदीमर हे रोग येतात. एका झाडाला १५ वर्षांपासून स्थानिक जात असेल तर ४० ते १०० किलो तर सुधारित जात असेल तर ६० ते १५० किलो फळे मिळतात.




## तुम्हीही 'या' पोझिशनमध्ये झोपता? झोप राहील अपूर्ण- श्वास घेण्यात होईल त्रास; गाढ झोप हवी असेल तर..

**दि.११विदर्भ प्रजासत्ताक**

झोपण्याची सर्वोत्तम वेळ म्हणजे रात्री. दिवसभरात शरीर थकते, आणि हा थकवा दूर करण्यासाठी आपण रात्री झोपतो शरीराला ८ तासांची झोप हवीच (क्शरश्रींह ढळाींश). ८ तास शरीराला विश्रांती मिळाल्याने दिवसभराचा थकवा तर दूर होतोच. शिवाय सकाळी ताजेतवाने वाटते. पण बऱ्याचदा सकाळी उठल्यानंतर अंग दुखते. किंवा रात्री खाल्लेलं अन्न व्यवस्थित पचत नाही. अपचनामुळे रात्रीची झोपही पूर्ण होत नाही. असे का होते? याचा आपण कधी विचार केला आहे का?



झोपताना आपण कोणत्या पद्धतीने झोपत आहोत, पोझिशन देखील महत्वाची ठरते. कारण बहुतांश लोक चुकीच्या पद्धतीने झोपतात. ज्यामुळे चांगली झोप लागत नाही आणि शरीर तणावाखाली राहते. आरोग्य तज्ज्ञ आणि लेखक प्रशांत देसाई यांनी उत्तम झोपेसाठी बेस्ट पोझिशन याची माहिती दिली आहे. शिवाय झोपताना कोणत्या चुका टाळायला हव्या? पाहा

**पाठीवर झोपणे चूक**

तज्ज्ञांनी झोपेच्या समस्येवर त्रस्त लोकांवर संशोधन केले असता, झोपेच्या चुकीच्या स्थितीमुळे झोपमोड आणि अंगदुखीचे कारण बनते. जे लोक पाठीवर झोपतात, त्यांना गाढ झोप येत नाही.ज्यामुळे मध्यरात्री अचानक जाग येते आणि झोपमोड होते.

**मोठ्याने घोरणे**

जे लोक पाठीवर झोपतात, त्यांच्या जबडा आणि घशाच्या स्नायूंवर दबाव येतो. श्वासोच्छवासाच्या नलिकेत अडथळे येऊ शकतात. ज्यामुळे लोक तोंडाद्वारे श्वास घेतात आणि घोरतात. शिवाय स्लीप एपनियाचाही त्रास होतो.

**उशी घेऊन झोपणे**

या समस्येवर उत्तम उपाय म्हणजे उशी घेऊन झोपणे. उशीमुळे मानेला आणि शरीराला आधार मिळतो. शिवाय श्वासोच्छ्वासाची नळी उघडी राहते. ज्यामुळे झोप चांगली लागते.

**साईड पोझिशन बेस्ट**

तज्ज्ञांच्या मते, साईड पोझिशनमध्ये झोपल्याने श्वासोच्छवासाच्या नलिकेत अडथळे येत नाही. ज्यामुळे घोरत नाही. त्यामुळे झोपताना नेहमी साईड पोझिशनमध्ये झोपावे.

# राज्यात तीन दिवस मुसळधार पावसाची शक्यता

## परतीच्या पावसाला अद्याप सुरुवात नाही



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती-** राज्यातून परतीच्या पावसाला अद्याप सुरुवात झाली नसून, १५ ऑक्टोबरपर्यंत हे चित्र स्पष्ट होणार असल्याची माहिती भारतीय हवामानशास्त्र विभागाच्या नागपूर येथील प्रादेशिक विभागाने दिली आहे. यामुळे आता राज्यात जो पाऊस होत आहे, त्याला परतीचा पाऊस म्हणता येणार नाही, असे या विभागाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, येत्या दिवसात विदर्भासह राज्यात पावसाची शक्यता वर्तविण्यात आली आहे.


सध्या परतीचा पाऊस हा देशातील पंजाब, हरयाणा, हिमालय, कच्छ, राजस्थान, उत्तर प्रदेश आणि मध्य प्रदेशचा काही भाग, गुजरातमध्ये परतला असून, महाराष्ट्राच्या नंदुरबार जिल्ह्याला स्पर्शून गेला आहे. राज्यातील परतीच्या पावसाचे चित्र १५ ऑक्टोबरपर्यंत स्पष्ट होण्याचे संकेत आहेत. येत्या तीन दिवसांत दक्षिण मध्य महाराष्ट्राच्या काही जिल्ह्यांतून म्हणजेच सांगली, सोलापूर, कोल्हापूर आणि दक्षिण कोकणात मुसळधार पावसाची शक्यता आहे. विदर्भातही काही जिल्ह्यांमध्ये मेघगर्जनेसह मुसळधार पावसाची शक्यता हवामान विभागाने वर्तवली आहे.

# तिसऱ्या दिवशी मनपा कर्मचाऱ्यांचा संप मिटला, एक दिवस काम, पुन्हा दोन दिवस सुट्टी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती-** महापालिका कर्मचाऱ्यांचा गेल्या तीन दिवसापासून सुरू असलेला संप गुरुवारी समाप्त झाला. प्रलंबित आर्थिक मागण्या मनपा प्रशासनाने संघटनेसोबत दुपारी बैठक बोलावून सोडविल्या. सकारात्मक चर्चा करून प्रशासनाने कर्मचाऱ्यांच्या हिताचा तोडगा काढण्याचे आश्वासन दिल्यामुळे कर्मचाऱ्यांनीसुद्धा संप मागे घेण्याचा निर्णय घेतला. त्यामुळे शुक्रवारी कर्मचारी एक दिवस कामकाज करून पुन्हा दोन दिवस शासकीय अवकाशावर जातील. त्यामुळे कामकाजावर मात्र प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. मनपा अधिकारी कर्मचाऱ्यांनी प्रलंबित मागण्यांसाठी मंगळवारपासून बेमुदत काम बंद आंदोलन सुरू केले होते.

दोन दिवस बैठक होऊनही काही तोडगा निघाला नाही, मात्र गुरुवारी कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य करीत प्रशासनाने लवकरच तोडगा काढण्याचे आश्वासन दिले. त्यापैकी प्रमुख मागण्यांमध्ये ७ व्या वेतन आयोगाच्या थकबाकीच्या रक्कमपोटी पहिला टप्पा अंदाजे



रुपये १३.५० कोटीपैकी रुपये ७ कोटी दिवाळीच्या ७ दिवसा अगोदर देण्यात येणार आहे व उर्वरित ६.५० कोटी मार्च २०२५ अखेर अदा करण्यात येईल असे प्रशासनाने लेखी आश्वासन दिले.तसेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचे मागील वर्षीच्या ७ व्या वेतनाची थकबाकी रुपये १००००/ व ४% महागाई भत्याची ६ महिन्यांची थकबाकी प्राधान्याने तातडीने देण्यात येइल असे प्रशासनाने आश्वासन दिले आहे. कर्मचाऱ्यांच्या अतिज्वलंत प्रलंबित आर्थिक मागण्यासंदर्भात मनपा प्रशासनाने संघटनेसोबत गुरूवारी दुपारी चर्चेकरिता बोलविण्यात आले.चर्चा ही सकारात्मक झालेली असून चर्चेमध्ये कर्मचाऱ्यांच्या हिताचा तोडगा निघालेला आहे. मनपा प्रशासनाच्या वतीने देण्यात आलेल्या लेखी आश्वासनानंतर कर्मचाऱ्यांनी शुक्रवारी सकाळी कामकाजावर पूर्ववत उपस्थिती दर्शवावी अशा सूचना दिल्या. तर दुसरीकडे मात्र मंगळवारपासून बंद असलेले कामकाज एक दिवस करण्यात येईल. त्यानंतर पुन्हा अधिकारी कर्मचारी दोन दिवस शासकीय अवकाशावर राहतील.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

कोणत्याही शंका किंवा अभिप्रायासाठी आम्हाला ईमेल करा -prajasattaknews24gmail.com
या पृष्ठावरील जाहिरातींसाठी किंवा मोफत अंक मो.वर मिळण्यासाठी संपर्क मो.८६२४९८५६३३, प्रिंट / PDF / वेब - पोर्टल /ई - पेपर

# विदर्भ प्रजासत्ताक

शुक्रवार दि. ११ ऑक्टोबर २०२४

शहर/ग्रामिण





## आमचा डीएन भाजपा चा... आमच्या रगारगात भाजपा...

# बडनेरा मतदार संघातून तुषार भारतीय यांनी फुकले रणशिंग

### भाजप नेते तुषार भारतीय यांच्या प्रचार कार्यालयाचा थाटात शुभारंभ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११बडनेरा–**

नवरात्रीच्या उत्सवाच्या रंगाबरोबर आता विधानसभा निवडणुकीचे रंग अमरावती जिल्ह्यात रंगायला लागलेत. एकमेकांवर कुरघोडी, आरोप प्रत्यारोप सर्वत्र सुरु असताना संपूर्ण अमरावती जिल्ह्याचे लक्ष लागलेल्या बडनेरा विधानसभा मतदार संघात आता जोरदार राजकीय वातावरण तापायला सुरुवात झालीय.बडनेरा मतदार संघ हा(महायुती)कडून युवा स्वाभिमीनीचे आ. रवि राणा यांना सुटणार असे स्पस्ट दिसत असताना आतापर्यंत शांत बसलेल्या भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी रणशिंग फुंकले असून 'लहरो सेडरकर कभी नौका पार नही होती... कोशिश करने वालो की कभी हार नही होती....!' असा निर्धार करीत अखेर भाजपचे नेते तुषार भारतीय यांच्या प्रचार कार्यालयाचा शुभारंभ करण्यात आला. सत्तेसाठी राजकारण आणि राजकारणासाठी सत्ता... शेवटच्या माणसाचा विकास साधण्यासाठी बडनेरा विधानसभेच्या रणांगणात 'कमळ' उतरविण्याची घोषणा केली. सभेला उपस्थित भाजप पदाधिकारी आणि यावेळी तुषार भारतीय यांनी थेट सोडलेले आरोपास्त्र पाहता भाजपातून एल्गार पुकारत, बंडखोरीचे रंग दिसायला लागले आहेत.

भाजप नेते तुषार भारतीय यांनीयांनी बडनेरात प्रचार कार्यालयाचा शुभारंभ केला. विशेष म्हणजे या कार्यक्रमात व्यासपीठावर माजी पालकमंत्री प्रवीण पोटे, भाजप प्रवक्ते शिवराय कुळकर्णी, जयंत डेहनकर, बादल कुळकर्णी, चेतन पवार यांच्यासह अनेक भाजप पदाधिकारी उपस्थित होते. . या कार्यक्रमाच्या निमित्ताने तुषार भारतीय यांनी व त्या ठिकाणी उपस्थित पदाधिकाऱ्यांनी भविष्याचे इरादे स्पष्ट केले.

श्रेष्ठींचा कल पाहता थेट निशाना कितीही नाही म्हटले तरी लोकसभेत भाजप श्रेष्ठींनी नवनित राणा यांना उमेदवारी दिल्यानंतर आतल्या आत विरोध होताच. त्याचे परीणाम काय व्हायचे ते झालेच. असे असताना सुद्धा आता पुन्हा बडनेरा मतदार संघात महायुतीचा पाठिंबा अससेल्या युवा स्वाभिमानीचे आ. रवि राणा यांना उमेदवारीबाबत पाठिंबा देण्याच्या तयारीत असल्याचे चित्र दिसत आहे. त्यामुळे या उमेदवाराला विरोध करीत कित्येक वर्षापासून पक्षासाठी झटणाऱ्या कार्यकर्त्याला, कमळ चिन्हाला उमेदवारी मिळावी, अशी मागणी करीत या कार्यक्रमातून भाजपच्या पदाधिकाऱ्यांनी भाजप श्रेष्ठींना इशारा देण्याचा प्रयत्न केला.




विशेष म्हणजे तुषार भारतीय यांनी तर थेट हल्लाबोल चढून एक प्रकारे आपल्या उमेदवारीची घोषणा केल्याचे दिसत होते.अचलपूर मतदार संघात मी विधानसभेची तयारी सुरु केली तेव्हा शिवसेनेला हा मतदार संघ सोडण्यात आला होता. त्यावेळी सुद्धा एल्गार पुकारला... आताही तसेच... आमच्या ताटातील दुसऱ्यांना का ? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

सत्तेसाठी राजकारण आहे, आणि राजकारणासाठी सत्ता आहे.

अगदी शेवटच्या माणसाचा विकास साधायचा असेल तर मग निवडणूक लढवावी लागेल, असे स्पष्ट करीत त्यांनी विधानसभा लढण्याचा निर्धार व्यक्त केला. आज बडनेरा मतदार संघाची दयनीय अवस्था झाली. रस्ते नाही, स्वच्छता नाही, खेळायला मैदाने नाही, डेंग्यूने जीव जातायेत. याला जबाबदार कोण? गेल्या तीन वर्षापासून मनपात नगरसेवक नाही, असे असताना जबाबदारी कुणाची ? केवळ निधीवरच डोळा.. आणि श्रेय लाटण्यासाठी पुढे-पुढे... अरे विमानतळाचे श्रेय काय घेता... आपल्या मतदार संघातील पांदण रस्ते बघा... यासाठी माननीय देवेंद्रजी आहेत. पंतप्रधान आहेत. आ. प्रतापदादा आहे. माननीय प्रवीण पोटे आहेत.हे वाट ते वाट... असे करून केवळ श्रेय घेण्याचे काम सुरु आहे.... म्हणून मठो मठी बंबाजींना कीर्तन करू द्या... विठू काय या बेईमानांना पावणार का? कधी कॉंग्रेस, कधी भाजप, कधी राष्ट्रवादी, कधी अपक्ष.... ! अशा शब्दात तुषार भारतीय यांनी नाव न घेता जोरदार हल्ला बोल केल्याने वातावरण चांगलेच ढवळून निघाले. त्यामुळे बडनेरा विधानसभा मतदार संघात चुरशीची निवडणूक होणार हे आता स्पस्ट झाले आहे.

---

# धार्मिक उत्सव, निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर पोलीस आयुक्तांनी घेतली अधिकाऱ्यांची बैठक

### अधिकाऱ्यांना दिल्यात महत्वाच्या टिप्स

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

दुर्गादेवी विसर्जन, दसरा, दिवाळी आणि येणारी विधानसभा निवडणूक पाहता पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी गुरुवारी दुपारी आयुक्तालयातील सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांची बैठक घेऊन शहराचा आढावा घेतला. तसेच खात्यातील खुपीया यंत्रणेला २४ तास सतर्क राहणाचे आदेश आयुक्तांनी दिले.शहरात मागिल काही दिवसात काही हिंसक घटना घडल्या आणि आपसी वादातून चार खून झाले. येणाऱ्या काळात दुर्गा व शारदा देवीचे विसर्जन आहे. दसरा उत्सव असल्यामुळे पूर्ण शहरात पोलिसांचा तगडा बंदोबस्त तैनात करावा तसेच प्रत्येक ठाण्यांतर्गत येणाऱ्या संवेदनशिल ठिकाणी फिक्स पॉईंट लावण्यात यावे, यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होणार नाही. दसरा झाल्यानंतर दिवाळी सण असल्यामुळे नागरिकांची बाजारपेठमध्ये मोठ्या प्रमाणात गर्दी असते. महिलासुध्दा खरेदी करण्याकरिता बाहेर पडतात. त्यामुळे सुरक्षेच्या दृष्टीने प्रत्येक चौकात पोलिसांनी बारकाईने लक्ष ठेवण्याची गरज आहे. वाहतूक कर्मचारी प्रत्येक चौकात हजर राहतील त्यामुळे अपघाताच्या घटना घडणार नाहीत. दिवाळी दरम्यान विधानसभा निवडणूक होण्याची शक्यता असल्यामुळे खुपीया

विभागातील प्रत्येक कर्मचाऱ्यांनी २४ तास सतर्क



असणे गरजेचे आहे. तसेच आपल्या परिसरातील कुठलीही माहिती मिळाली तर ती लगेच वरिष्ठांना सांगावी. त्यामुळे वेळीच योग्य ती कारवाई करता येणार. गुन्हेशाखेचे दोन्ही युनिट, सीआईयू पथक, सह ठाण्यातील कर्मचारी सतत आपआपल्या हद्दीत गस्तीवर राहणार आहेत, अशा महत्त्वाच्या सूचना पोलीस आयुक्त नवीनचंद्र रेड्डी यांनी अधिकाऱ्यांना दिल्या. यावेळी तीन्ही डीसीपी, एसीपी आणि सर्व ठाणेदार बैठकीला हजर होते.

---

# विदर्भासाठी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचं 'मिशन ५१'; भाजपाला तारणार का?

***विदर्भ प्रजासत्ताक***
***दि.११नागपूर : –***

*आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघ सक्रिय होणार असल्याचे स्पष्ट संकेत मिळू लागले आहेत. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ विदर्भात 'मिशन ५१' अंतर्गत काम करणार असल्याचे बोललं जात आहे. विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभुमीवर भारतीय जनता पक्ष व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या विविध संघटनांची समन्वय बैठक नागपूरच्या रेशीमबाग येथील स्मृती मंदिरात झाली. त्यात विदर्भात 'मिशन ५१'चं लक्ष निर्धारित करण्यात आलं, अशी माहिती समोर आलीय.*

*'आरएसएस' देणार बळ : राज्यात लोकसभा निवडणुकीत भाजपाला अपेक्षित यश मिळालं नाही. याचा फायदा विरोधक हे विधानसभा निवडणुकीत घेण्याची शक्यात आहे. त्यामुळं भाजपाला बळ देण्यासाठी 'आरएसएस' पावलं उचलण्यास सुरुवात केली.*

*निवडणुकीत भाजपा आणि 'आरएसएस' हे विदर्भावर जास्त लक्ष ठेवून असल्याची माहिती समोर आली आहे. त्यामुळंच*



*गुरुवारी दोघांमध्ये नागपुरात बैठक पार पडली.*

*विदर्भातील ५१ जागेवर संघाचा फोकस : राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी निगडीत असलेल्या सामाजिक समरसता मंच, सामाजिक सद्भावना मंच, स्वदेशी जागरण मंच इत्यादी गतीवीधींच्या प्रमुख बैठकीत झाली आहे.*

*यात विदर्भातील ११ जिल्ह्यातील संघ आणि भाजपाचे पदाधिकारी बैठकीत उपस्थित होते. विदर्भातील ६२ पैकी ५१ जागांवर संघाचा फोकस असणार आहे.*

*संघ व भाजपा रणनिती आखणार : काँग्रेसच्या खोट्या नॅरेटीव्हला चोख उत्तर देण्यासाठी संघ व भाजपा रणनिती आखणार आहे. संघाचे सह सरकार्यवाह अतुल लिमये यांच्या प्रमुख उपस्थितीत ही बैठक संपन्न झाली आहे. विधानसभा निवडणूकीत अतुल लिमये यांच्यावर संघ व भाजपामध्ये समन्वयाची महत्त्वाची जबाबदारी आहे.*

---

# देवाभाऊ आता भाजपच्या प्रचाराची नवी टॅगलाईन

### नागपुरसह राज्यात जोरदार प्रचार सुरू

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११ नागपूर–** देवेंद्र फडणवीस उर्फ देवा भाऊ हेच दोन शब्द टॅगलाईन म्हणून वापरत भारतीय जनता पक्षाने नागपुर,अमरावती सह राज्यात जोरदार प्रचार सुरू केला आहे. आधी लाडकी बहिण योजनेच्या प्रचारासाठी भाजपने देवा भाऊ या टॅगलाईनचा वापर केला. आता शहरात आणि राज्यात देवेंद्र फडणवीस यांच्या प्रयत्नांनी झालेले विकास कामे मतदारांपर्यंत पोहोचण्यासाठी शहरात विविध भागात फलक लावत देवा भाऊ या आशयाने जोरदार प्रचार सुरू केला आहे. विधानसभा निवडणुकीची घोषणा पुढील आठवड्यात होण्याची शक्यता बघता गेल्या तीन चार दिवसांपासून शहरातील विविध भागात विकास कामांच्या भूमिपूजनाच्या आणि लोकार्पणाचा धडाका सुरू आहे. विदर्भातील बहुतांश सर्वच मतदारसंघात निवडणुकीची तयारी सुरू झाली असून विविध विकास कामावरुन धन्यवाद देवा भाऊ असे फलक लागले आहे. शहरातील विविध भागातही अशा प्रकारचे फलक लावले जात आहे.एरवी फडणवीस




साहेब किंवा देवेंद्रजी असा उल्लेख फडणवीस यांच्याबाबत पक्षात केला जातो. पण लाडकी बहीण योजनेची घोषणा झाल्यानंतर आता त्यांना देवा भाऊ म्हणून संबोधले जाते. नागपूरला मेट्रो दिल्याबद्दल. धन्यवाद देवा भाऊ, नागपुरात एम्स रुग्णालय आणल्याबद्दल. आयआयएम आणि इतर शैक्षणिक संस्था सुरू केल्याबद्दल. नाग नदी प्रदूषण मुक्त करण्यासाठी भरघोस निधी दिल्याबद्दल, शहरातील तलावां चे सौंदर्यीकरण केल्याबद्दल . सर्व महत्त्वाचे चौक आणि प्रमुख सार्वजनिक स्थान, सर्वच ठिकाणी देवा भाऊ चे असेच होर्डिंग दिसून येत आहे आणि त्याद्वारे फडणवीस यांनी गेल्या अनेक वर्ष शहराचे नगरसेवक, महापौर, आमदार, राज्याचे मुख्यमंत्री, विरोधी पक्ष नेता आणि उपमुख्यमंत्री म्हणून केलेल्या कामाचा लेखाजोखा सर्वांसमोर मांडला जात आहे.

**राजकीय कारकीर्द–** देवेंद्र फडणवीस १९९९ पासून नागपुरात सलग २५ वर्ष आमदार आहेत.भाजपमध्ये आणि प्रशासनात त्यांनी वेगवेगळे पद भूषवले आहे. नागपूरकरांसाठी चांगलेच परिचयाचे आहेत. सामान्य नागरिकांशी देवेंद्र फडणवीस यांचा कनेक्ट वाढविण्यासाठी भाजपने ही देवा भाऊ या टॅगलाईनसह प्रचार सुरू केला आहे. योगायोगाने राज्य सरकारच्या लाडकी बहीण या योजनेमुळे सध्या राज्यात लाडका भाऊ या शब्दाला ही तेवढीच प्रसिद्धी मिळत आहे. मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्री राज्यातील महिलांचे भाऊ म्हणून स्वतःला प्रोजेक्ट करीत आहेत. त्यामुळे नागपुरात आधीच देवा भाऊ या नावाने सर्वांच्या परिचयाचे असलेले देवेंद्र फडणवीस यांना देवाभाऊ ही टॅगलाईन जास्त संयुक्तिक वाटत असल्याने भारतीय जनता पक्षाने त्याच टॅग लाईनचा प्रचारासाठी वापर केला आहे.

---

# निष्क्रियतेचा ठपका ठेवत राष्ट्रवादी पवार गट जिल्हाध्यक्ष प्रदीप राऊत पदावरून पायउतार

## मला पदावरून काढण्यामागे सुनील वऱ्हाडे, शरद तसरे, प्रकाश बोंडे हे नेते जबाबदार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती :** ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर गुरुवारी अमरावती जिल्ह्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस (शरद पवार) पक्षाच्या पदाधिकाऱ्यांनी आपल्या पदाचे राजीनामे दिलेत. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील यांनी जिल्हाध्यक्ष प्रदीप राऊत यांचा पदावरून पायउतार केल्यामुळं नाराज पदाधिकाऱ्यांनी बंड केला.

जिल्हाध्यक्षांचा केला पायउतार : राष्ट्रवादी कॉंग्रेस शरद पवार गटाचे अमरावती जिल्हाध्यक्ष प्रदीप राऊत यांच्याकडे लोकसभा निवडणुकीत अमरावती आणि वर्धा लोकसभा मतदार संघाची प्रमुख जबाबदारी होती. मात्र ऐन विधानसभा निवडणुकीच्या तोंडावर त्यांना जिल्हाध्यक्षपदावरून काढून त्यांच्यावर प्रदेश संघटन सचिव ही नवी जबाबदारी देण्यात आली. विश्वासात न घेता आपल्याला पदावरून काढलं, अशी नाराजी प्रदीप राऊत यांनी व्यक्त केली.

पाच महिन्यात आम्ही पक्ष संघटना मजबूत केली नव्या नेतृत्वाची फळी उभी केली, असं असताना कुठलंही कारण



न देता किंवा चर्चा न करता आपल्याला पदावरून काढून टाकलं. हा आपल्या पक्षनिष्ठेचा व कार्याचा अवमान असल्यामुळं आपण प्रदेश संघटना सचिव पदाचा राजीनामा देत आहोत, असं प्रदीप राऊत यांनी सांगितलं. प्रदीप राऊत यांच्यासोबतच राष्ट्रवादी कॉंग्रेस सेवा दलचे जिल्हाध्यक्ष किशोर बर्डे सामाजिक न्याय विभागाचे सुनील कीर्तनकार आदी पदाधिकाऱ्यांनी देखील राजीनामे दिलेत.

आपल्याला जिल्हाध्यक्ष पदावरून काढून टाकण्याचा जो काही निर्णय घेण्यात आला, त्यासाठी पक्षाचे माजी जिल्हाध्यक्ष सुनील वऱ्हाडे, विधानसभेचे माजी उपसभापती शरद तसरे, प्रकाश बोंडे हे नेते जबाबदार असल्याचा आरोपही प्रदीप राऊत यांनी केला. पक्ष वाढीसाठी शून्य कर्तृत्व असणाऱ्या या नेत्यांनी वरिष्ठांची कान भरणी केली, असं देखील प्रदीप राऊत यांनी म्हटलं आहे.

# केंद्र सरकारची कारवाई; 'हिज्ब-उत-तहरीर' दहशतवादी संघटनेवर घातली बंदी

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११ नवी दिल्ली-** दहशतवादाविरोधात केंद्र सरकारची झिरो टॉलरन्स पॉलिसी आहे. दरम्यान, गृह मंत्रालयाने गुरुवारी (१० ऑक्टोबर) जागतिक पॅन इस्लामिक फुटीरवादी संघटना हिज्ब-उत-तहरीर वर बंदी घातली आहे. मंत्रालयाने दिलेल्या माहितीनुसार, जिहादद्वारे लोकशाही सरकार उलथून टाकून भारतासह जागतिक स्तरावर इस्लामिक राज्य आणि खिलाफत स्थापन करणे, हे या संघटनेचे उद्दिष्ट आहे.गृह मंत्रालयाने या संघटनेला भारताच्या लोकशाही प्रणाली आणि अंतर्गत सुरक्षेसाठी गंभीर धोका म्हटले आहे.

केंद्रीय गृहमंत्रालयाने या संघटनेवर बंदी घालताना सांगितले की, ही संघटना एक जागतिक पॅन-इस्लामिक कट्टरतावादी संघटना आहे, ज्याची स्थापना १९५३ मध्ये जेरुसलेममध्ये झाली होती.

या संघटनेला आता सरकारनी प्रतिबंधित संघटना म्हणून घोषित केले आहे.

केंद्र सरकारचा असा



विश्वास आहे की, हिज्ब-उत-तहरीर संघटनेचा भारतातील विविध दहशतवादी कारवायांमध्ये भाग आहे. त्यामुळे सरकारने या संघटनेला बेकायदेशीर क्रियाकलाप (प्रतिबंध) कायदा १९६७ अंतर्गत प्रतिबंधित संघटना म्हणून घोषित केले आहे.

यापूर्वी, तामिळनाडूतून संघटनेशी संबंधित अनेकांना अटक करण्यात आली होती. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, बुधवारी राष्ट्रीय तपास संस्थेने (छख-) या संघटनेच्या 'नकीब' आणि 'आमिर' फैजुल रहमानला अटक केली. आरोपींनी हिज्ब-उत-तहरीरची विचारधारा विविध गटांमध्ये पसरवण्यासाठी अनेक गुप्त बैठका घेतल्या आणि तमिळनाडूमध्ये फुटीरतावादी मोहिमा केल्याचा आरोप आहे.

### संघटना ISIS साठी काम करते

केंद्रीय गृह मंत्रालयाने एका अधिसूचनेत म्हटले की, निष्पाप तरुणांना इस्लामिक स्टेट (आयएसआयएस) सारख्या दहशतवादी संघटनांमध्ये सामील होण्यास प्रवृत्त करण्यात आणि दहशतवादी कारवायांसाठी निधी उभारण्यात हिज्ब-उत-तहरीरचा प्रमुख सहभाग आहे. ही संघटना विविध सोशल मीडिया प्लॅटफॉर्म आणि प्सद्वारे भोळ्या भाबड्या तरुणांना दहशतवादी कारवायांमध्ये सामील होण्यासाठी प्रोत्साहित करते.

# मराठीतून विद्यार्थ्यांना घेता येणार वैद्यकीय शिक्षण

## पीएम नरेंद्र मोदी यांनी केले 'मेडिकल'चे ऑनलाइन उद्घाटन



**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११अमरावती-** नवीन शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या निर्मितीमुळे वैद्यकीय शिक्षण घेण्यास इच्छुक पात्र विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळणार आहे. तसेच आता येथे प्रवेशित विद्यार्थ्यांना त्यांच्या मातृभाषेतून म्हणजेच मराठीतून देखील वैद्यकीय शिक्षण घेता येणार असल्याचे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी म्हणाले. प्रवेश प्रक्रियेसाठी मान्यता मिळालेल्या राज्यातील दहा शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे उद्घाटन बुधवारी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑनलाईन करण्यात आले. यामध्ये अमरावती वैद्यकीय महाविद्यालयाचा देखील समावेश आहे.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते दूरदृश्य प्रणालीद्वारे ते उद्घाटन करण्यात आले. अमरावती येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे उद्घाटन कार्यक्रमाचे आयोजन नियोजन भवनात करण्यात आले होते. यावेळी खा. डॉ. अनिल बोंडे, आ. रवी राणा, आ. प्रताप अडसड, जिल्हाधिकारी सौरभ कटियार, मुख्य कार्यकारी अधिकारी संजिता मोहपात्रा, मनपा आयुक्त सचिन कलंत्रे, अपर जिल्हाधिकारी सूरज वाघमारे, शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. किशोर इंगोले, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. दिलीप सौंदळे, डॉ. अनिल बत्रा, एमआयडीसी असोसिएशनचे अध्यक्ष किरण पातूरकर उपस्थित होते. नव्याने निर्माण होणारे वैद्यकीय महाविद्यालय लाखो परिवारांचे सेवेचे केंद्र ठरणार असल्याचे पीएम नरेंद्र मोदी म्हणाले.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे ऑनलाइन उद्घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्यात आले. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे हा कार्यक्रम पार पडला. यानंतर काही वेळाने आमदार रवी राणा यांनी या वैद्यकीय महाविद्यालयातील व त्याला संलग्न ४३० खाटांच्या रुग्णालयासाठी मंजूर करण्यात आलेल्या आलियाबाद येथील शासकीय जागेवर भूमिपूजन कार्यक्रमही पार पडला.

# 'त्या' १०५८ उमेदवारांना एसटीच्या सेवेत सामावून घेणार!

## - भरत गोगावले

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११ मुंबई :**सरळ सेवा भरती सन २०१९ अंतर्गत अतिरिक्त यादीवरील एकूण १०५८ उमेदवारांना एसटीच्या सेवेमध्ये चालक तथा वाहक या पदावर सामावून घेतले जाणार असल्याची माहिती एसटी महामंडळाचे अध्यक्ष भरत गोगावले यांनी दिली.

सन २०१९च्या भरतीमध्ये निवड झाल्यापैकी गैरहजर अथवा अपात्र ठरलेल्या उमेदवारांच्या ऐवजी त्याच भरती मधील प्रतीक्षा यादीवरील सुमारे ३३७ उमेदवारांना नेमणूक देण्याची प्रक्रिया महामंडळात सुरू करण्यात येत आहे. तसेच, प्रतीक्षा यादीवरील उर्वरित सर्व ७२१ उमेदवारांना आवश्यकते प्रमाणे व रिक्त जागेनुसार रा. प. सेवेत सामावून घेण्याची



कार्यवाही करणेबाबत निर्णय घेण्यात आला आहे.

या संदर्भात संबंधित उमेदवार, लोकप्रतिनिधी यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, अध्यक्ष भरत गोगावले यांना भेटून निवेदन सादर केले होते.


त्यांच्या निवेदनाचा सहानुभूतीपूर्वक विचार करून त्यांना तातडीने नेमणुका देण्याच्या सूचना अध्यक्ष भरत गोगावले यांनी दि. ०१.१०.२०२४ रोजीच्या रा. प. महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत दिल्या होत्या. त्यानुसार संबंधितांना नेमणुका देण्याची प्रक्रिया वेगाने सुरू असून, या सर्व उमेदवारांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अध्यक्ष भरत गोगावले यांचे आभार मानले आहेत.

# परिचारिका अभ्यासक्रमाचा पेपर फुटला, बुलढाण्यात विद्यार्थ्यांकडे आढळली प्रश्नपत्रिका

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११बुलढाणा : -** राज्यातील पेपरफुटीची मालिका अजूनही कायमच आहे. बुलढाणा जिल्ह्यात परिचारिका अभ्यासक्रमाची प्रश्नपत्रिका फुटल्याचे आज आढळून आले. विध्यार्थ्यांच्या व्हाट्सअॅप ग्रुपवर पूर्ण प्रश्नपत्रिकाच आल्याचे आणि आजच्या पेपरमधील प्रश्न जवळपास सारखेच असल्याचे प्राथमिक चौकशी आढळून आले. याप्रकरणी आत्तापर्यंत पाच परीक्षार्थींचे मोबाईल जप्त करण्यात आले असून प्रश्नपत्रिका मिळालेल्या परीक्षार्थींची संख्या वाढण्याची शक्यता आहे.

बुलढाणा शहरातील एका परीक्षा केंद्रावर घडलेल्या या प्रकाराची माहिती नर्सिंग परीक्षा मंडळ आणि वरिष्ठ अधिकाऱ्यांना देण्यात आली असून त्यांनी, तातडीने कडक कारवाई करा असे आदेश दिले आहे. राज्यात आज परिचारिका अर्थात जीएनएम द्वितीय वर्षाचा पेपर होता. बुलढाणा जिल्ह्यातील स्थानिक शासकीय रुग्णालयातील परिचारिका वसतिगृहामध्ये एक केंद्र आणि दुसरे केंद्र हे शहरातीलच पैनगंगा नर्सिंग कॉलेज हे होते. सकाळी ११ ते २ या वेळेत पेपर सुरू असतानाच शासकीय परिचारिका वसतिगृहात काही विद्यार्थी कॉपी करत असल्याचे शिक्षकांच्या लक्षात आले. एका विद्यार्थ्यांच्या शर्टाच्या बाहीवर नक्कल (कॉपी) असल्याचे आढळले. ही बाब



लक्षात येताच त्या विद्यार्थ्याची तपासणी आणि प्रश्नांची पडताळणी करण्यात आली असता पेपर फुटल्याचे निष्पन्न झाले.

या घटनेची माहिती नर्सिंग परीक्षा मंडळाला (एमएसबीएनपी) देण्यात आली. त्यानंतर पाच परीक्षार्थींचे मोबाईल जप्त करण्यात आले. पेपरनंतर लिंकची तपासणी केली असता त्यांच्या व्हाट्सअॅप ग्रुपवर संपूर्ण प्रश्नपत्रिकाच आल्याचे आढळून आले. अधिक चौकशी आणि तांत्रिक पडताळणीअंती बुधवारी रात्री पावणेनऊ वाजताच्या सुमारास परीक्षार्थींच्या मोबाइलवर प्रश्नपत्रिका आल्याचे दिसून आले. सखोल तपासणीत बऱ्याच विद्यार्थ्यांना आज होणाऱ्या पेपरची कॉपी रात्रीच त्यांच्या व्हाट्सअॅपवर आली होती, असे उघडकीस आले. राज्यात आज जीएनम द्वितीय वर्षाची परीक्षा होती. मानसिक आरोग्य परिचर्या विषयाचा आज तिसरा पेपर होता. बुलढाणा जिल्ह्यात शासकीय रुग्णालयातील परिचारिका वसतिगृहामध्ये एक केंद्र आणि दुसरे केंद्र हे पैनगंगा नर्सिंग कॉलेज या ठिकाणी होते. आज सकाळी ११ ते दोन या वेळेत पेपर सुरू होता. शासकीय परिचारिका वसतिगृहात काही विद्यार्थी कॉपी करत असल्याचे शिक्षकांच्या लक्षात आले, त्यांनी अजून तपासणी केली असता बऱ्याच विद्यार्थ्यांच्या मोबाईलमध्ये आज होणाऱ्या पेपरची कॉपी रात्रीच त्यांच्या व्हाट्सअॅपवर आल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. केंद्र प्रभारींनी सदर बाब वरिष्ठांना कळविली आहे, आठ ते दहा विद्यार्थ्यांचे मोबाईल जप्त करण्यात आले आहेत, पुढील कारवाई सुरू आहे, अशी माहिती परीक्षा केंद्राच्या प्रभारी मीना शेळके यांनी दिली.

# विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी उपक्रम जिल्ह्यात 'निपुण पर्व अभियान' यशस्वीपणे राबवा

## - जिल्हाधिकारी अजित कुंभार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि. ११अकोला, :** निपुण भारत अभियानातर्गत 'निपुण पर्व' हा उपक्रम विद्यार्थ्यांची गुणवत्ता वाढविण्यासाठी उपयुक्त असून, तो शाळांमधून प्रभावीपणे राबविण्याचे निर्देश जिल्हाधिकारी अजित कुंभार यांनी आज येथे दिले.

अभियानाच्या जिल्हा सुकाणू समितीची सभा जिल्हाधिका-यांच्या दालनात झाली. त्यावेळी ते बोलत होते. जिल्हा परिषदेच्या मुख्य




कार्यकारी अधिकारी बी. वैष्णवी, 'डाएट'च्या प्राचार्य रत्नमाला खडके, प्राथमिक शिक्षणाधिकारी रतनसिंग पवार आदी उपस्थित होते.

**पायाभूत साक्षरता व**



**संख्याज्ञान**

शाळेतील एकही विद्यार्थी शिक्षणात मागे राहू नये व भविष्यासाठी त्याला सर्व पायाभूत शिक्षण प्राप्त व्हावे यासाठी हे अभियान राबविण्यात येत आहे. विद्यार्थ्यांना अध्ययनात येणा-या अडचणी लक्षात घेऊन त्यावर मात करण्यासाठी मार्गदर्शन, उजळणी आदी कार्यक्रम जिल्ह्यात जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था तसेच शिक्षण विभाग यांच्यावतीने राबविण्यात येणार असल्याची माहिती प्राचार्य रत्नमाला खडके यांनी दिली.

पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान विद्यार्थ्याला अवगत व्हावे यावर अभियानाचा मुख्य भर असेल. या अनुषंगाने दि. १८ ऑक्टोबरला इयत्ता पहिली ते पाचवीच्या विद्यार्थ्याची स्तरनिश्चिती करण्यात येणार आहे. पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान प्राप्त न झालेल्या विद्यार्थ्यांसाठी ६० दिवसांचा कृती कार्यक्रम राबविण्यात येईल, असेही त्यांनी दिले.

# दिल्लीतून दोन हजार कोटी रुपयांचे कोकेन जप्त


## रमेशनगर भागातून दिल्ली पोलिसांकडून २०० किलो ड्रग्ज जप्त

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११ नवी दिल्ली :**

दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने दिल्लीतून २ हजार कोटी रुपयांचे कोकेन जप्त केले आहे. सुमारे २०० किलो ड्रग्ज जप्त करण्यात आले आहेत. दिल्ली पोलिसांच्या स्पेशल सेलने रमेश नगर भागातील एका गोदामातून ते जप्त केले. यासह आतापर्यंत ७ हजार कोटी रुपयांचे ड्रग्ज जप्त करण्यात आले आहेत.

दुबईत उपस्थित भारतीय नागरिक वीरेंद्र बसोया याचे नाव आंतरराष्ट्रीय सिंडिकेटचा मास्टरमाईंड म्हणून समोर आले आहे. बसोयाला यापूर्वीच भारतात ड्रग्ज प्रकरणात अटक करण्यात आली होती. मात्र



जामीन मिळाल्यानंतर तो दुबईला गेला आणि आंतरराष्ट्रीय ड्रग्ज कार्टेलचा मोठा माफिया बनला. ५ हजार कोटी रुपयांच्या ड्रग्ज सिंडिकेटचा मास्टरमाईंड आणि मुख्य आरोपी तुषार गोयल आणि वीरेंद्र बसोया हे जुने मित्र असल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे.

# धनगड दाखले रद्द प्रकरण; सहा जणांवर कठोर कारवाईचे निर्देश!

## छत्रपती संभाजीनगर समितीचा निर्णय : कलम १० ते १२ नुसार उगारला बडगा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.११छत्रपती संभाजी नगर -** संभाजीनगर येथील एकाच कुटुंबातील सहा जणांनी 'धनगड' या अनुसूचित जमातीचे 'कास्ट व्हॅलिडिटी' प्रमाणपत्र वर्ष २००१ ते २००७ या कालावधीत मिळविले होते. अनुसूचित जमाती प्रमाणपत्र तपासणी समिती छत्रपती संभाजीनगर यांनी या सहाही जणांची 'कास्ट व्हॅलिडिटी' प्रमाणपत्र ३ ऑक्टोबर २०२४ रोजी रद्द करुन महाराष्ट्र अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्ग व विशेष मागास प्रवर्ग अधिनियम २००० च्या कलम १० ते १२ मधील विहित तरतुदी अन्वये कारवाई करण्याचे निर्देश संबंधितांना दिले आहे. या सहाही जणांची नावे भाऊसाहेब खिल्लारे, रमेश खिल्लारे, कैलाश खिल्लारे, मंगल खिल्लारे, सुभाष खिल्लारे, सुशील खिल्लारे अशी आहे.सहा वैधताधारक यांचे रक्तसंबंधातील सदस्य सागर कैलाश खिल्लारे यांनी समितीकडे जमात दावा पडताळणीसाठी २ जुलै २०१८ रोजी सेवाप्रयोजनार्थ प्रस्ताव अर्ज दाखल केला होता. पोलिस दक्षता पथकाचे चौकशी अधिकारी यांनी चौकशी कार्यवाहीची पूर्तता करून ५



डिसेंबर २०२३ रोजी समितीस अहवाल सादर केला. चौकशी अहवालामध्ये जमात दाव्याशी विसंगत माहिती व पुरावे प्राप्त झाल्याने अर्जदार आणि त्याच्या रक्त संबंधातील वैधताधारकांना ६ डिसेंबर २०२३ रोजी कारणे दाखवा नोटीस बजावून खुलासा मागविण्यात आला होता. आणि वैधताधारक यांना २७ डिसेंबर २०२३, २९ जानेवारी २०२४ व ७ फेब्रुवारी २०२४ रोजी सुनावणीची संधी प्रदान करण्यात आली होती.

दरम्यानच्या कालावधीत वैधताधारक यांनी मुंबई उच्च न्यायालयासमोर सुनावणी सुरू असलेल्या याचिकेमध्ये शपथपत्र सादर करून ते 'धनगड' अनुसूचित जमातीपैकी नसल्याचे शपथपत्र सादर केले होते. उच्च न्यायालयाने खिल्लारे कुटुंबातील वैधताधारक सदस्यांच्या सामाजिक दर्जाबाबत नोंदविलेले निरीक्षण विचारात घेऊन छत्रपती संभाजीनगर समितीने या सहाही जणांचे जमात प्रमाणपत्र व जातवैधता प्रमाणपत्र रद्द केले आहे.

### कायद्यात काय शिक्षा आहे?

कलम १० नुसार सेवेतून तत्काळ सेवामुक्त करणे, आजपर्यंत घेतलेले किंवा प्राप्त केलेले इतर कोणतेही लाभ जमीन महसुलाच्या थकबाकी प्रमाणे वसूल करणे. पदवी, पदविका किंवा इतर कोणतीही शैक्षणिक अर्हता रद्द होईल.

कलम ११ नुसार सहा महिन्यांपेक्षा कमी नसेल; परंतु दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या सश्रम कारावासाची किंवा दोन हजार रुपयांपेक्षा कमी नसेल; परंतु वीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्य दंडाची किंवा या दोन्ही शिक्षा.

कलम १२ नुसार फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ मध्ये काहीही अंतर्भूत असले तरी शिक्षापात्र अपराध दखलपात्र व बेजमानती असतील. प्रत्येक शिक्षापात्र अपराधाची संक्षिप्त रीतीने प्रथम श्रेणी दंडाधिकाऱ्याकडून न्यायचौकशी करण्यात येईल.

# जातीय समीकरण आवश्यकच, मात्र हिंदुत्वापासून दूर जाऊ नका; संघाने टोचले भाजप पदाधिकाऱ्यांचे कान

## मूळ कॅडरच्या कार्यकर्त्यांकडे लक्ष देण्याची सूचना




विदर्भ प्रजासत्ताक
दि.११ नागपूर

आगामी विधानसभा निवडणूकीच्या दृष्टीने भाजपकडून मायक्रो लेव्हलवर नियोजन करण्याच्या सूचना वरिष्ठ पातळीवरून देण्यात आल्या आहेत. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय स्वयंसेवक संघातर्फे भाजपच्या नियोजनाचा आढावा घेण्यात आला. जिल्ह्यातील १२ मतदारसंघातील नियोजन व तेथील सामाजिक समीकरणांच्या दृष्टीने संघाकडून जाणून घेण्यात आले. भाजपकडून दुर्लक्ष करण्यात येत असलेल्या काही बाबींवर यावेळी संघाकडून कान टोचण्यात आले. विशेषत: राज्यात जातीय समीकरणांचे गणित जुळविणे तर बरोबर आहे, मात्र हिंदुत्वापासून दूर जाऊ नका अशी सूचना यावेळी करण्यात आली.


सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार संघाचे सहसरकार्यवाह अतुल लिमये यांच्या मार्गदर्शनात ही बैठक झाली. यात संघाशी जुळलेल्या काही संस्थांचे पदाधिकारी व भाजपचे जिल्ह्यातील आमदार, पदाधिकारी उपस्थित होते. भाजपमध्ये तिकीट कुणाला द्यावे तो तुमचा प्रश्न आहे. मात्र मूळ कॅडरच्या कार्यकर्त्यांकडे देखील लक्ष दिले पाहिजे. त्यांनी पक्षाला इथपर्यंत आणले आहे याचा विसर पडू देऊ नका असे लिमये यांनी सांगितले. यावेळी संघाकडून जिल्ह्यातील सर्व मतदारसंघांतील सामाजिक समीकरणांचा आढावा घेण्यात आला. अनेक कार्यकर्ते लोकसभेत गाफील राहिले. त्यांना सक्रियपणे कामाला लावा. तसेच सोशल माध्यमांवर केवळ लाईक करून चालणार नाही. त्यावर कार्यकर्त्यांनी व्यक्त व्हायला हवे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे विरोधकांकडून आरक्षणावरून जनतेत संभ्रम निर्माण करण्याचा प्रयत्न झाला. अशा विषयांना तथ्यांवर आधारित उत्तरे देत जनतेतील संभ्रम दूर करण्यावर भर द्यावा, अशी सूचना संघाकडून करण्यात आली.

### मताधिक्य असलेल्या बुथवरील मतदान टक्का वाढवा

लोकसभा निवडणूकीत ज्या बुथवर भाजपला मताधिक्य होते, तेथील मतदानाची टक्केवारी ४० ते ४५ टक्के इतकी होती. तर जिथे भाजपला मताधिक्य नव्हते तेथे मतदानाचा टक्के ६० टक्का दिसून येत होता. प्रभाव असलेल्या भागातील लोक हव्या त्या प्रमाणात बाहेर निघाले नाही किंवा भाजपला त्यांना मतदानकेंद्रांपर्यंत नेता आले नाही. मताधिक्य असलेल्या बुथवरील मतदान टक्का वाढवा व तो ६० टक्क्यांवर न्या असे गणितच संघाकडून मांडण्यात आले.

# नवरात्र उत्सवाच्या अखंड ज्योत सप्ताहात ६५९ घटांची स्थापना

## मालखेड येथे अंबा देवीचे नवरात्रोत्सव, दर्शनासाठी गर्दी




विदर्भ प्रजासत्ताक
दि.११मालखेड

तालुक्यातील मालेखड येथे अंबा देवीचा नवरात्रोत्सव सुरू आहे. येथे नवरात्रीनिमित्त अखेड ज्योत लावल्या आहेत. या अखंड ज्योत सप्ताहात ६५९ घटांची स्थापना केली आहे. महंत शिवानंदपुरी महाराज या अखंड ज्योतींची देखरेख करीत आहेत.

भाविकांचीही देवीच्या दर्शनासाठी गर्दी उसळत असून दुरदुरून भाविक येथे दर्शनासाठी येत असून पहाटेपासून भाविकांची दर्शनासाठी रांग लागत आहे.

तालुक्यातील मालखेड येथील भानामती नदीच्या काठावर वसलेल्या मालखेड येथे निसर्गरम्य वातावरणात वास्तव्य असलेले अंबा मातेचे, शिवशंकराचे मंदिर असून भाविकांची येथे गर्दी पाहायला मिळते. अंबा माता स्वयंभू असून ती मालखेडवासीयांचे ग्रामदैवत म्हणून ओळखली जाते.

महाराष्ट्रातील भाविक मंदिरात दर्शना करिता येतात विशेष म्हणजे शिवालय, अंबामाता यांचे एकाच ठिकाणी असणारे हे मंदिर आहे. भाविकाचे श्रद्धास्थान असलेल्या या मंदिरात नवरात्री दरम्यान नऊ दिवस येथे उत्सव साजरा केला जातो. मागील २९ वर्षांपासून येथे अखंड ज्योत स्थापनेची सुरूवात झाली आहे. तेव्हापासून दरवर्षी अविरतपणे ही परंपरा सुरू आहे. या वर्षी ६५९ घटांची स्थापना केली आहे. दरवर्षी हा आकडा वाढत जात आहे. दररोज सकाळी आणि सायंकाळी होणाऱ्या महाआरतीला भक्तगणांची उपस्थिती असते. गावातील पंडित संजयपंत जोशी महाराज हे आरतीची तयारी करतात. दरवर्षी या काळात महाप्रसादाचे आयोजन केले जाते. भाविक दर्शनाचा लाभ घेत आहेत. या वर्षी सोमवारी १४ ऑक्टोबरला महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. भाविकांनी देवीच्या दर्शनासह कार्यक्रमांचा लाभ घेण्याचे आवाहन संस्थानाचे पदाधिकारी, ग्रामस्थांद्वारे करण्यात आले आहे.

भाविकांना आकर्षित करतो मंदिर परिसरमंदिराला लागून असलेली भानामती नदी ही दक्षिणवाहिनी नदी असून, या नदीच्या तीरावर केलेली पूजा विधी ही सफल होतो, अशी भाविकांची श्रद्धा आहे. चोहीकडे हिरवागार निसर्गरम्य व शांत परिसर भाविकांना आकर्षित करीत असतो.

# सोयाबीन सोंगायला मजूर मिळेना

## सोंगणी, काढणीचा खर्च जास्त, शेतकऱ्यांची भटकंती



विदर्भ प्रजासत्ताक
दि.११ तिवसा

ऐन पावसाच्या सावटाखाली एकाच वेळी सोयाबीन सोंगायला सुरुवात झाली. यादरम्यान सोयाबीन सोंगणीसाठी मध्य प्रदेशातून येणारे आदिवासी मजूर यावर्षी कमी आल्याने सोयाबीन सोंगण्याकरिता मजुरांच्या शोधात शेतकऱ्यांना भटकती करावी लागत आहे.

शेतकऱ्यांना गतवर्षी कपाशीला अपेक्षित भाव मिळाला नाही. विशेष म्हणजे, यावर्षी भारतीय हवामान खात्याने चांगल्या पावसाचा अंदाज दिला. अपेक्षित पावसामुळे सोयाबीन चांगले पिकेल, या अपेक्षेने शेतकऱ्यांनी कपाशीऐवजी सोयाबीनला पसंती दिली. मृग नक्षत्रात पेरलेले सोयाबीन एकाच वेळी कापणीला आल्याने शेतकऱ्यांनी मजुरांची जुळवाजुळव करीत सोयाबीन कापणीला सुरुवातकेली आहे. पावसाचे सावट, कापणीला आलेले सोयाबीन आणि मध्य प्रदेशातूनकमी आलेले मजूर अशी एकाच वेळी सर्व परिस्थिती निर्माण झाली आहे, शिवाय सततच्या पावसाने जमीन ओलसर असल्याने हार्वेस्टर वापरावर मर्यादा आल्या आहेत. मजुरांच्या शोधात बळीराजा गावोगावी फिरत आहे. हे सर्व पाहून स्थानिक मजूर

३,००० ते ३,२०० भावाने सोयाबीन सोंगत आहे. यावर्षी सोयाबीनचे उतारे एकरी एक ते दोन क्विंटल आहे. बाजार समितीत सोयाबीनची गुणवत्ता पाहून ३,५०० ते ४,२०० भावात विकले जात आहे. सोयाबीन भावापेक्षा सोंगणी काढणीचा खर्च जास्त असल्याने पिवळ्या सोन्याने शेतकऱ्यांना रडवले आहे.

# भूकंपाचा अभ्यास करुन भूगर्भशास्त्रज्ञांची चमू परतली, दोन दिवसांत देणार अहवाल




विदर्भ प्रजासत्ताक
दि.११ अमरावती

चिखलदरा व इतर तालुक्यातील भूकंपाच्या अभ्यासासाठी चिखलदरा येथे दाखल झालेली भूगर्भशास्त्रज्ञांची दोन सदस्यीय चमू आज, गुरुवारी सकाळी तेथून परतली. दरम्यान येत्या दोन दिवसात ही चमू आपला अहवाल जिल्हा प्रशासनाला सादर करणार आहे. चिखलदऱ्यासह अचलपुर, अंजनगाव सुर्जी, भातकुली व काही प्रमाणात तिवसा तालुक्यात गेल्या आठवड्यातील सोमवारी दुपारी भूकंपाचे सौम्य धक्के जाणवले होते. रिश्टर स्केलवर हा भूकंप ४.२ – तीव्रतेचा नोंदवला गेला होता, तर त्याचा केंद्रबिंदू जमीनीच्या आत साडे १३ किलोमीटर अंतरावर होता. पाचही तालुक्यांतील भूकंपाने कुठलीही जिवीत हानी झाली

नसली तरी चिखलदरा तालुक्यातील काही गावांतील जुन्या इमारतीच्या भिंतींना या भूकंपाचा हादरा बसला. त्यामुळे भिंतींना तडे जाऊन जर्जर झालेल्या इमारती नादुरुस्त झाल्या, असा अहवाल तेथील तहसीलदार जीवन मोरणकर यांनी पाठवला होता. दरम्यान भूकंपाच्या दुसऱ्याच दिवशी नागपूर येथील भूगर्भशास्त्रज्ञांची एक चमू जिल्हाधिकारी कार्यालयात दाखल झाली होती. भारतीय भूवैज्ञानिक (जीएसआय) मध्य विभाग नागपुरचे निदेशक डॉ. अजय कुमार यांच्या मार्गदर्शनात त्याच कार्यालयाचे वरिष्ठ भूवैज्ञानिक भूपेश उकिरडे आणि आशिष भारसाकडे यांचा त्यात समावेश आहे. या चमूने जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्यासोबत बैठक केल्यानंतर दोन दिवसांनी प्रत्यक्ष कामाला सुरुवात केली. या दरम्यान त्यांनी आजूबाजूच्या वीसहून अधिक गावांतील नागरिकांच्या भेटी घेऊन काही निरीक्षणे नोंदवली. या निरीक्षणांचा अभ्यास आणि भूकंपाबाबत त्यांच्याकडे नागपुर मुख्यालयी असलेले इतर तपशिल याआधारे ते अहवाल तयार करणार आहे. सदर दौऱ्यात निवासी नायब तहसीलदार तावडे हेही त्यांच्यासोबत होते. दरम्यान चिखलदऱ्यात आल्यानंतर त्यांनी भूकंपाचा केंद्रबिंदू असलेल्या ठिकाणचा नकाशा तयार करून कोठून कोठे जावे, कोठे काय निरीक्षणे करावी आदी बाबींची योजना आखली होती. दरम्यान त्यांच्या अहवालात नेमक्या कोणत्या नोंदी घेतल्या जातात, याची सर्वांना उत्सुकता असून, त्या अहवालाची प्रतीक्षा केली जात आहे.

# अंबा - टेलीकॉम कॉलनीतील नागरीकांचा वाली कोण? परीसरात व घरात दररोज निघतात सरपटणारे प्राणी

## आमच्या जिवाची व आरोग्याची जबाबदारी नेमकी कुणाची ? नागरीकांचा सवाल



विदर्भ प्रजासत्ताक
दि.११अमरावती

अमरावती महानगरपालिका हद्दीतील अंबा टेलीकॉम कॉलनीतील हणुमान मंदिर परीसरातील मनपाच्या गार्डनची खुली जागा ही आजाराला निमंत्रण देत आहे,सोबतच सरपटणरे प्राणी दररोज परीसरातील नागरीकांच्या घरात निघत आहे,घरात लहान मुले असतात त्यांच्या जिवीताची जबाबदारी नेमकी कुणाची? सततचा पाऊस व वातावरणातील बदलामुळे परीसरात डासांचे प्रमाण वाढले आहेत फॉगींगचा पत्ताच नाही, सोबतच वाढलेली गवत व ईतर दाट झाडी झुडपांमध्ये अनेक सरपटणारे प्राणी दररोज आढळल्याने परीसरातील नागरीकांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे व हणुमान मंदिर परीसर व मागच्या बाजुला एक शाळा सुद्धा आहे व तेथे शेकडो लहान मुले शिकायला येतात हे विशेष उल्लेखनीय आहे तरीसुद्धा महानगरपालिकेतर्फे कुठलीही उपाययोजना नाही अंबा टेलीकॉम कॉलनी आदिवासी बहुल एरीयासारखी विकासापासून वंचीत असी वाटत आहे कारण तेथील मुख्य रस्तेसुद्धा खडड्यांनी व्याप्त आहेत,परीसरात नर्सरी ते चौथी पर्यंत असलेल्या शाळेत जायला मुलांनां चिखल व खड्यातून जावे लागते ही विशेष उल्लेखनीय बाब आहे परीसरातील नागरीकांची मागणी आहे की आयुक्तांनी खुर्ची सोडून परीसरात फेरफटका मारावा, खत्री मंगलकार्यालयाच्या बाजुला असलेला मुख्य रस्ता असंख्य खड्यांनी व्यापलेला आहे त्यामुळे पालक,रहीवासी अनेक अडचणीचा सामना करत आहे.परीसरात अनेक घरी आजाराचे प्रमाण वाढतच आहे महानगरपालिका निवडणूका लांबल्या पण प्रशासन झोपेच सोंग घेत आहेत का ? प्रशासक म्हणून त्यांची जबाबदारी नाही का ? असे अनेक प्रश्न उपस्थित होत आहे.

# विधानसभा निवडणुकीसाठी १६ हजार कर्मचाऱ्यांची फौज

## प्रशासन कामाला; मतदान केंद्रांचे होणार वेब कास्टिंग




विदर्भ प्रजासत्ताक
दि.११अमरावती

आगामी विधानसभा निवडणुकीसाठी प्रशासन सज्ज झाले आहे. निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी सुमारे १६ हजार ९२ कर्मचारी लागणार आहेत. याअनुषंगाने निवडणूक विभागाने नियोजन सुरू कैले आहे. याकरिता विविध विभागाकडून कर्मचाऱ्यांची माहिती मागविण्यात आली आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांना प्रशिक्षण दिले आहे. येत्या १३ ते १७ ऑक्टोबरपर्यंत ११८ सहायक निवडणूक अधिकारी यांचे पाच दिवसाचे प्रशिक्षण प्रबोधिनीमध्ये होईल. विधानसभा निवडणुकीतदेखील मतदान केंद्रावर वेब कास्टिंग करण्यात येणार आहे. यामुळे केंद्रावर अधिकाऱ्यांचा वॉच असेल. आचारसंहिता लागू होण्यापूर्वी प्रशासनाने निवडणुकीची तयारी युद्धपातळीवर सुरू केलेली आहे. जिल्ह्यात ८ विधानसभा मतदारसंघांत २ हजार ६८२ मतदान केंद्र राहणार आहेत.

### मतदान यंत्राविषयी जनजागृती

मतदानासाठी ईव्हीएमचा वापर होतो आहे. परंतु मतदान यंत्राविषयी प्रश्नचिन्ह उपस्थित करण्यात येत आहे. यामुळे निवडणूक आयोगाने मतदान यंत्र सुरक्षित असल्याबाबत नागरिकांमध्ये जनजागृती करण्याची मोहीम हाती घेतली आहे. त्यानुसार जिल्हाभरात १० सप्टेंबर ते १ ऑक्टोबरदरम्यान ठिकठिकाणी ईव्हीएम व व्हीव्हीपॅट ठेवून मतदानाचा डेमो दाखविण्यात आला,विधानसभा निवडणुकीसाठी निवडणूक विभागाकडून तयारी केली जात आहे. निवडणुकीसाठी नियुक्त अधिकारी, कर्मचायांचे प्रशिक्षणाचे विविध टप्पे सुरु आहेत. मतदान यंत्राविषयी गैरसमज दूर करण्यासाठी मतदारामध्ये मतदान यंत्रावर प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आलेले आहे.

**– प्रवीण देशमुख, नायब तहसीलदार निवडणूक विभाग.**

# 'एचव्हीपीएम'च्या अनुज सारवानला सुवर्णपदक

विदर्भ प्रजासत्ताक
दि.११अमरावती

महाराष्ट्र शासन , क्रीडा व युवक संचालनालय पुणे व महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती संभाजीनगर येथे ७ ते ९ ऑक्टोबर या कालावधीत आयोजित कुस्ती स्पर्धेत पाचवेळा विदर्भ केसरी बहुमान पटकावणारे पहिलवान व आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक डॉ. संजय तीरथकर यांचा शिष्य अनुज सारवानने ६३ किलो वजन गटात सुवर्णपदक जिंकले. अनुज हा राष्ट्रीय पदक विजेता आहे. अमरावती शहर जिल्हा कुस्तीगीर संघाचा मल्ल अनुजची कुस्ती ग्रीको रोमन प्रकारात ६३ किलो वजन गटात पहिली कुस्ती धुळ्याच्या अरबाज शेख विरोधात झाली. अनुजने या अशा बलाढ्य पहीलवानाला ४ – ० ने एकतर्फी पराभूत केले. दुसऱ्या लढतीत कोल्हापूरचा पहिलवान सागर पाटीलला ६–२ ने धुळ चारली. चुरशीच्या अंतिम लढतीत साताऱ्याचा मल्ल यश जाधवला आसमान दाखवून अनुज सुवर्णपदकाचा मानकरी ठरला. अनुज नियमितपणे एनआयएस प्रशिक्षक जितेंद्र भुयार यांच्या मार्गदर्शनात सराव करतो. एचव्हीपीएमच्या सचिव डॉ. माधुरी चेंडके, प्रा. रवींद्र खांडेकर यांचे त्याला नियमित प्रोत्साहन मिळत असते.

# अकोल्यावरून नागपूर करिता निघालेल्या नादुरुस्त शिवशाही बसला बडनेरा नजीक आग

## टायर फुटल्याने लागली आग



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११बडनेरा**

बडनेरा येथील पोलीस स्टेशन समोर महाराष्ट्र राज्य महामंडळाच्या शिवशाही बसला अचानक भिषण आग लागली मात्र चालकाच्या सतकरतेमुळे वीस प्रवाशांचे प्राण वाचण्याची घटना शुक्रवारच्या सकाळी दहाच्या दरम्यान घडली.या घटनेमुळे चांगलीच खळबळ उडाली होती.

प्राप्त माहिती नुसार नागपूर येथील गणेश पेठ आगाराची शिवशाही एसटी बस क्रमांक एम एच झिरो सिक्स बी डब्ल्यू झिरो नाईन झिरो थ्री ही बस नादुरुस्त असल्यामुळे दोन दिवसापासून अकोला आगारात उभी होती तात्पुरती दुरुस्ती करून अकोल्यावरून नागपूरला ही बस बोलावण्यात आली मात्र गणेश पेठ आगाराचे व्यवस्थापक यांनी विना कंडक्टर बस घेऊन व प्रवासी भरून आणण्यास सांगितल्याचे समजते त्यानुसार चालक यांनी ए आर लासुरकर यांनी आदेशाचे पालन करीत वीस प्रवासी घेऊन अकोल्यावरून नागपूर करिता रवाना झाले बडनेरा नजीक एसटी बस मध्ये बिघाड असल्याचे लक्षात येतात. चालक लासुरकर यांनी प्रवाशांना उतरून दुसऱ्या बसमध्ये पाठविले व रिकामी बस घेऊन नागपूरकडे रवाना झाले असता बडनेरा येथील पोलीस स्टेशन समोर अचानक टायर फुटले व बस थांबेपर्यंत शंभर फुटाच्या अंतरावर बस थांबल्यानंतर अचानक टायरने पेट घेतला व काही क्षणातच आगीने रौद्ररूप धारण केले. सुरुवातीला नागरिकांनी पाण्याच्या बकेटने पाणी मारून आग विझवण्याचाआटोकाट प्रयत्न केला परंतु आगीचे भिषण रूप घेतल्याने त्यांचे प्रयत्न असफल ठरले, बडनेरा पोलीस स्टेशनचे वरिष्ठ निरीक्षक सुनील चव्हाण व पोलीस कर्मचार्यांनी ही आग विझवण्यासाठी शर्थीचे प्रयत्न केले,बडनेरा मनपाचे अग्निशामक दल राज्यपालांच्या बंदोबस्ताकरिता बेलोरा विमानतळावर असल्याने येण्यास विलंब झाला तोपर्यंत बसचा बराच भाग जळून खाक झाला होता. मात्र अग्निशामक दलाच्या दोन ते तिन गाड्या आल्यानंतर आग आटोक्यात आली. एस टी महामंडळ अनेक काल बाह्य बसेस वापरत असल्याने अशा दुर्घटना घडने ही नित्याचीच बाब झाली आहे एका प्रकारे प्रवाशांच्या जीवाशी खेळ होतअसल्याचे या घटनेवरून लक्षात येते.घटनेची माहिती मिळताच सहाय्यक वाहतूक अधीक्षक भूमिका वैद्य यांनी एसटी कर्मचाऱ्यां सह घटनास्थळी धाव घेतली. परंतु निवासी आगार व्यवस्थापक वैशाली भाकरे ह्या निवासस्थानी राहत नसल्यामुळे घटनास्थळी दिसून आल्या नाहीत अशा गंभीर घटना घडल्या तर व्यवस्थापकाची जबाबदारी घटनेवर नियंत्रण आणण्याची असते मात्र आगार व्यवस्थापकच निवासस्थानी राहत नसल्यामुळे अनेक समस्या निर्माण होत असल्याचे कुणाच्या आशीर्वादाने आगार व्यवस्थापक निवासस्थानी राहत नाहीत अशी चर्चा एसटी कर्मचाऱ्यांमध्ये दिसून आली.

आग विझवण्याकरिता बडनेरा मनपा अग्निशामक दलाचे अधीक्षक अजय पंधरे यांच्या मार्गदर्शनात फायरमनअजय ढोके, गोविंद घुले ,वैभव गजभारे, संतोष केंद्रे ,गोपाल भाकरे, नरेश राऊत ,सचिन वराडे आदींनी अथक परिश्रम घेतले.अकोला आगारात दोन दिवसापासून नादुरुस्त अवस्थेत उभी असलेली बस तात्पुरती दुरुस्त करून नागपूरला प्रवासी घेऊन का बोलवण्यात आली प्रवासादरम्यान ना दुरुस्त बसणे काही आघाडीत झाले तर प्रवाशांच्या जीवाची जबाबदारी कोण घेणार होते विना कंडक्टर बस मध्ये प्रवासी का? असे फर्मान का दिले असे एक ना अनेक प्रश्न निर्माण होत असून. आता चौकशीत काय निष्पन्न होते हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# दसऱ्यासाठी लावलेला झेंडू बाजारात

## झेंडूच्या फुलांना मागणी, १०० रुपये किलोपर्यंत भाव



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ११ अमरावती**

एका दिवसावर दसरा येऊन ठेपला आहे. त्यामुळे झेंडू उत्पादकांनी दसऱ्यासाठी लावलेला झेंडू बाजारात आणायला सुरूवात केली आहे. गणपती उत्सव, नवरात्र उत्सव-दसरा आणि दिवाळी या तीन उत्सवात झेंडूचे दर वाढलेले असतात. यंदा अतिपावसामुळे भाव वाढण्याची शक्यता आहे. मात्र, दसऱ्याच्या निमित्ताने होणारी अन्य आवकही जास्तच असण्याची शक्यता आहे. यामुळे ८० ते १०० रूपये किलोपर्यंत यंदा झेंडूचे भाव आहेत.

गणपती उत्सवात यंदा झेंडूच्या फुलांच्या किमती दुपटीपेक्षा अधिक होत्या. गेली दोन महिने झालेल्या मुसळधार पावसाचा फटका फुलशेतीला बसला आहे. अनेक ठिकाणी फुलशेती कोलमडली आहे. उत्पादनापेक्षा मागणी जास्त आहे. त्यामुळे फुलांना चांगले बाजारभाव मिळत आहे. दसऱ्याला बाजारभाव यामुळे अधिक वाढले आहे, असे विक्रेत्यांनी सांगितले.यावर्षी अनेक गावात सतत झालेल्या मुसळधार पावसामुळे फुलांची रोपे व झाडे वाया गेली. परिणामतः मोठ्या प्रमाणात मागणी असूनही फुलांचा पुरवठा करता येत नाही.

पितृ पंधरवडच्यात झेंडूचे प्रती किलो बाजारभाव ३० ते ४० रुपये होते. नवरात्रीत ६० ते ८० रुपये बाजारभाव होते. सर्वच फुलांचे बाजारभाव वाढल्याने ग्राहकही मोठ्या हाराएवजी लहान आकाराच्या हाराला पसंती देत होते. दसऱ्याला झेंडूचे फुल ८० ते १०० पर्यंत विक्रीला सध्या आहे. झेंडू १०० पांढरी शेवंती १८० ते २२५ गुलछडी / रजनीगंधा ३०० गुलाब प्रती २० अस्टर २०० शेकडा असे आहेत.

# अंबादेवी व एकविरा देवीला सुका मेव्याच्या ३१११ किलो प्रसाद अर्पण

## आज सकाळ पासून भक्तांना प्रसादाचे वितरण सुरु



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

श्री अंबादेवी, श्री एकवीरा देवीला महाअष्टमी निमित्त श्री अंबादेवी श्री एकवीरा देवी आरती मंडळाद्वारे यंदा ३१११ किलोचा सुक्या मेव्याचा प्रसाद अर्पण करण्याचा संकल्प सोडण्यात आला होता. यंदा त्यात २०० किलोने वाढ झाल्यामुळे हा प्रसाद ३३११ किलोपर्यंत वाढला आहे.

मागील ३० वर्षांपासूनची ही परंपरा अव्याहतपणे सुरू असून, यंदा रात्री १० वाजता दोन्ही देवींना वाजत गाजत ९ कन्यकांच्या हस्ते प्रसाद अर्पण करण्यात आला. शहरातील देवींचे भाविक, नागरिक, व्यापारी व आरती मंडळाचे सदस्य स्वयंप्रेरणेने या प्रसादात योगदान देतात. नवरात्रोत्सव सुरू झाले की, आरती मंडळाद्वारे आवाहन केले जाते. त्यानंतर अष्टमीपर्यंत ११ प्रकारचा सुकामेवा जमा होतो. सुक्या मेव्याचा प्रसाद दोन्ही देवींना ९ कन्यकांद्वारे अर्पण केल्यानंतर तो ३३११ किलोच्या प्रसादान मिसळला जातो. रात्रभर एकत्र करून नवमीला पहाटे दर्शनाला येणाऱ्या भाविकांना वितरित करण्यात आला, अशी माहिती श्री अंबादेवी, श्री एकवीरादेवी आरती मंडळाद्वारे देण्यात आली. आरती मंडळाच सदस्य अजय बपोरिकर, हरिहर गावंडे, मंगेश कुडे, मनीष देशपांडे, प्रतीक इंगळे, आतीष खानापुरे, भरत धानोरकर, निखील ठाकरे नवरात्रोत्सव सुरू झाल्यानंतर प्रसाद गोळा करण्याच्या कामी लागतात. पॅकेट्स गोळा करून सभागृहात आणून ठेवतात. अष्टमीला रात्री ९ वाजताच्या सुमारास सर्व सुक्या मेव्याचे पॅकेट्स फोडून त्यातील मेवा एकत्र मिसळण्यात आला.व आज सकाळपासून या प्रसादाचे भक्तांना वितरण करण्यात येत आहे.



# राणा दाम्पत्यांची अंबादेवी,एकविरा देवीच्या दर्शनासाठी पदयात्रा

## गंगा सावित्री निवासस्थान ते अंबा एकवीरा देवी मंदिरापर्यंत जय माता दी च्या घोषणा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११ अमरावती**

आमदार रवी राणा माजी खासदार सौ नवनीत रवी राणा यांची हजारो भाविक भक्त व स्वाभिमानी शिलेदारांसह अमरावतीची कुलदेवता आई अंबादेवी व एकवीरा देवी मंदिरात अनवाणी पायाने महापदयात्रा,गंगा सावित्री निवासस्थान ते अंबा एकवीरा देवी मंदिरापर्यंत जय माता दि च्या जय घोषात चालत जावून केली त्यानंतर महाआरती व होम पूजा राणा दाम्पत्यांनी केली

देशाचे यशस्वी पंतप्रधान नरेंद्र जी मोदी यांच्या नेतृत्वात राज्यात पुन्हा महायुती चे सरकार यावे अमरावती जिल्ह्यात किमान ५ ठिकाणी कमळ चीन्हावरील उमेदवार निवडून यावे माजी खासदार सौ नवनीत रवी राणा

**आई अंबादेवीला साकडे घातले**

राज्यातील शेतकऱ्यांना या वर्षी चांगले उत्पादन व्हावे,शेतमालाला योग्य भाव मिळावा व शेतकरी शेतमजूर यांची दिवाळी आनंदात जावी,राज्यात महायुती चे सरकार येवून पुन्हा देवेंद्र फडणवीस मुख्यमंत्री व्हावे व त्यांच्या नेतृत्वात आपले राज्य देशात १ नंबर होवून लाडकी बहीण योजनेचे १५०० चे ३००० व्हावे शेतकरी, शेतमजूर, व्यापारी, उद्योजक, ज्येष्ठ नागरिक,महिला,युवक युवती यांच्या जीवनात सुख समृध्दी शांती नांदावी,तसेच महायुतीमध्ये युवा स्वाभिमान पार्टीलाबडनेरा, दर्यापूर, मेळघाट अश्या ३ जागा मिळाव्या अशी प्रार्थना आमदार रवी राणा यांनी यावेळी करून सर्वांना दसऱ्याच्या शुभेच्छा दिल्या. यावेळी आमदार रवी राणा,माजी खासदार सौ नवनीत रवी राणा यांच्या समवेत हजारो भाविक व युवा स्वाभिमान पदाधिकारी तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.

# विजयादशमीचा शुभ मुहूर्त नेमका कधी? वाचा पूजा पद्धत आणि या दिनाचं महत्त्व

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.११अमरावती**

शारदीय नवरात्रीचे नऊ दिवस पूर्ण झाल्यानंतर म्हणजेच महानवमीच्या दुसऱ्या दिवशी दसरा म्हणजेच विजयादशमीचा दिवस असतो. आश्विन महिन्याच्या शुक्ल पक्षातील दशमी तिथीला दसरा २०२४ साजरा केला जातो. हिंदू धर्मात या दिवसाला फार महत्त्व आहे. या दिवशी भगवान रामाने रावणावर विजय मिळवला म्हणून या दिवशी रामाची पूजा केली जाते. दसरा हा सण वाईटावर चांगल्याच्या विजयाचा प्रतिक म्हटला जातो. त्यानुसार, यंदा १२ ऑक्टोबर रोजी दसरा साजरा केला जाणार आहे. या निमित्ताने दसऱ्याचा शुभ मुहूर्त आणि पूजा पद्धत जाणून घेऊयात.

### दसरा शुभ मुहूर्त

हिंदू पंचांगानुसार अश्विन महिन्यातील शुक्ल दशमी तिथी १२ ऑक्टोबरला सकाळी १० वाजून ५८ मिनिटांपासून सुरु होईल आणि १३ ऑक्टोबरला सकाळी ९ वाजून ८ मिनिटांपर्यंत असणार आहे. दसरा हा सण वाईटावर चांगल्याच्या विजयाचे प्रतिक मानले जाते.

### दसऱ्याचे महत्त्व

दसरा या शब्दाला दशहरा असे देखील म्हणतात. तसेच,




विजयाच्या संदर्भात या दिवसाला दशहरा, दसरा तसेच विजयादशमी असेही म्हणतात. या दिवशी प्रभू श्री रामाने लंकेचा राजा रावणाचा वध करुन विजय मिळवला होता. हा सण हिंदू सणांमध्ये प्रामुख्याचा मानला जातो. साडेतीन मुहूर्तांपैकी एक मुहूर्त असणारा दसरा. पौराणिक कथेनुसार या दिवशी दुर्गा देवीने देवी चंडीकेचे रुप धारण करुन महिषासुर नावाच्या राक्षसाचा वध केला होता. दसरा हा सण वाईटावर चांगल्याच्या विजयाचा प्रतिक म्हटला जातो. अश्विन शुक्ल पक्ष दशमीच्या दिवशी प्रभू रामाने रावणाचा वध करुन सीतेला सोडवले होते. तेव्हापासून दसरा साजरा करण्याची पद्धत आहे. तसेच या दिवशी रावणासह कुंभकर्ण आणि मेघनाद यांच्या पुतळ्याचेही दहन केले जाते.

### दसऱ्याच्या दिवशी जुळून आला शुभ संयोग...

यंदा दसऱ्याचा शुभ मुहूर्त हा १२ ऑक्टोबरला असणार आहे. या दिवशी रवि योगासह सर्वार्थ सिद्धी योग तयार होत आहे. या योगात कोणतेही काम केल्यास ते यशस्वी होतील. दसऱ्याला रवि योग दिवसभर असल्यामुळे सर्व प्रकारचे दोष दूर होतील. तसेच सकाळी ६ वाजून २० मिनिटांपासून ते रात्री ९ वाजून ८ मिनिटांपर्यंत सर्वार्थ सिद्धी योग असेल. दसऱ्याला शस्त्रपूजन करण्याचा शुभ मुहूर्त हा दुपारी २ वाजून ३ मिनिटांपासून ते २ वाजून ४९ मिनिटांपर्यंत असेल.